RNI. REG. NO. MAHBIL/2023/86118

दैनिक
# लोकरक्षणाय

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ

ठाणे । शनिवार, १३ जून २०२६ । वर्ष ०४ । अंक ७३ । पृष्ठे ०८ । मूल्य २ रूपये

मनाली ते खरदुंग ला ४२५ किमीचा खडतर प्रवास



पान ३ वर

# धुळे – नंदुरबारला राज्याच्या विकासाचे नवे 'ग्रोथ इंजिन' बनवणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## अण्णासाहेब चुडामण पाटील यांच्या 'अजिंक्य' चरित्रग्रंथाचे प्रकाशन

● धुळे, सचिन कदम :

धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यांमध्ये प्रचंड विकासक्षमता आहे. राज्याच्या विकासाला नवी गती देणारी 'ग्रोथ इंजिन्स' म्हणून या दोन्ही जिल्ह्यांचा विकास करण्याचा शासनाचा निर्धार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. एनसीपीए येथील टाटा थिएटरमध्ये आयोजित माजी खासदार दिवंगत अण्णासाहेब उपाख्य चुडामण पाटील यांच्या 'अजिंक्य' या जीवनचरित्राच्या प्रकाशन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, राज्यमंत्री पंकज भोयर, खासदार शोभाताई बच्छाव, आमदार अमरीशभाई पटेल, ज्येष्ठ



अभिनेते अनुपम खेर, सौरभ शुक्ला, विनय सहस्त्रबुद्धे, कुणाल पाटील, माजी आमदार जयंत पाटील, चित्रा



वाघ उपस्थित होते.

राज्याच्या नव्या विकास आराखड्यात धुळे व नंदुरबारला महत्वाचे स्थान

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, धुळे जिल्ह्याने अनेक दशकांपासून महाराष्ट्राला समृद्ध केले आहे.

या भागातील मानवी संसाधने, उद्योग, शिक्षण आणि कृषी क्षेत्रातील क्षमता लक्षात घेऊन राज्याच्या नव्या विकास आराखड्यात या दोन्ही जिल्ह्यांना महत्वाचे स्थान दिले जाणार आहे. ● पान २ वर

# १ ऑगस्टपासून महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी एनसीएमसी स्मार्ट कार्ड बंधनकारक – परिवहन मंत्री

● मुंबई, विशाल कारंडे :

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या प्रवासी सेवांमध्ये अधिक पारदर्शकता, सुलभता आणि डिजिटल व्यवहारांना चालना देण्यासाठी १ ऑगस्ट २०२६ पासून महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिक प्रवाशांसाठी एनसीएमसी (नॅशनल कॉमन मोबिलीटी कार्ड) स्मार्ट कार्ड बंधनकारक करण्यात येणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर राज्यभर



एनसीएमसी स्मार्ट कार्ड नोंदणी आणि वितरण मोहिमेला वेग आला असून आज अखेर राज्यातील सुमारे ५१ लाख नागरिकांनी एनसीएमसी स्मार्ट कार्डसाठी नोंदणी केली आहे. त्यापैकी सुमारे २५ लाख स्मार्ट कार्ड कार्यान्वित करण्यात आले आहेत. उर्वरित नोंदणीकृत लाभार्थ्यांची कार्ड्स लवकरच सुरू करण्यात येत असल्याने लाभार्थ्यांनी विलंब न करता आपली प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी आणि कार्ड वितरण प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी राज्यभरात ४ हजारांहून अधिक स्मार्ट कार्ड वितरण केंद्रे कार्यरत आहेत. ग्रामीण आणि शहरी भागातील नागरिकांना सहजपणे कार्ड उपलब्ध व्हावे यासाठी ही केंद्रे सक्रियपणे सेवा देत आहेत. ● पान २ वर

# संत्रा निर्यातीवरील अनुदान राज्य सरकारकडून रद्द

● मुंबई, विशाल कारंडे :

भारत आणि बांगलादेश यांच्यातील संबंध सध्या तणावपूर्ण असतानाच, महाराष्ट्र सरकारने संत्रा निर्यातीला चालना देण्यासाठी सुरू केलेली प्रोत्साहनपर योजना रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. मार्केटिंग विभागाने जारी केलेल्या नुकत्याच दिलेल्या आदेशानुसार, राज्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी सुरू करण्यात आलेली ही योजना अपेक्षित परिणाम साधण्यात अपयशी ठरली आहे. २०२३ मध्ये या योजनेला मंजुरी देताना, सरकारने बांगलादेशात भरावे लागणाऱ्या आयात शुल्काच्या ५० टक्के रक्कम प्रोत्साहनपर अनुदान म्हणून देण्यासाठी १६९.६० कोटी रुपयांची तरतूद केली होती.



सरकारने काढलेल्या शासन निर्णयानुसार, काही लोकप्रतिनिधींनी ही योजना रद्द करण्याची आणि निर्यातदारांना दिले जाणारे अनुदान थांबवण्याची मागणी केली होती. या विषयावर १४ मे रोजी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा करण्यात आली. ● पान २ वर

# कल्याण बॅनर्जींनीही ममतांची सोडली साथ

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

तृणमूल काँग्रेसमधील कलह आणखी वाढू लागला असून अभिषेक बॅनर्जी यांच्या विरोधात बंड पुकारणाऱ्यांची संख्या वाढते आहे. पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि खासदार कल्याण बॅनर्जी यांनी गुरुवारी पक्षप्रमुख ममता बॅनर्जी यांना थेट अल्टिमेटम दिला आहे. 'माझ्यात आणि पुतण्या अभिषेक बॅनर्जीमध्ये कोणा एकाची निवड करा,' असे आव्हान देत कल्याण बॅनर्जी यांनी अभिषेक हे 'अहंकारी' आणि 'अस्थिर मानसिकतेचा' असल्याचा गंभीर आरोप केला आहे.

यापुढे अभिषेक बॅनर्जी यांच्याशी संबंधित कोणत्याही कायदेशीर बाबी किंवा न्यायालयीन याचिकांमध्ये आपण प्रतिनिधित्व करणार नाही मात्र, तृणमूल काँग्रेस पक्षाशी संबंधित खटले लढवणे सुरूच ठेवू, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

सीआयडीच्या स्वाक्षरी बनावट प्रकरणाच्या



चौकशीत कल्याण बॅनर्जी हे कलकत्ता उच्च न्यायालयात अभिषेक बॅनर्जी यांची बाजू मांडत होते. मात्र, मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या कालीघाट येथील निवासस्थानावरील टीएमसी कार्यालय आणि अभिषेक यांच्या कॅमॅक स्ट्रीटवरील कार्यालयावर पडलेल्या सीआयडीच्या छाप्यांविरोधात डायमंड हार्बरचे खासदार अभिषेक बॅनर्जी यांनी स्वतंत्र रिट याचिका दाखल केल्याची माहिती कल्याण बॅनर्जी यांना मिळाली. येथूनच दोन्ही नेत्यांमधील वाद टोकाला पोहोचला.

# "शासनाच्या योजना कागदावर नव्हे, तर नागरिकांच्या जीवनात दिसल्या पाहिजेत" – अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे

● नंदुरबार, नितीन देवळेकर :

"शासनाच्या योजना कागदावर नव्हे, तर नागरिकांच्या जीवनात दिसल्या पाहिजेत," असे प्रतिपादन राज्याचे अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे यांनी आज नंदुरबार तालुक्यातील विविध शासकीय कार्यालये, आरोग्य संस्था आणि महसूल यंत्रणांच्या पाहणी दौऱ्यादरम्यान केले. शासनाच्या सेवा व योजना तळागाळातील नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचत आहेत का, याची प्रत्यक्ष खातरजमा करण्यासाठी त्यांनी विविध ठिकाणी भेटी देऊन कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. दौऱ्यादरम्यान नागरिकाभिमुख प्रशासन, सेवा वितरणातील पारदर्शकता, प्रलंबित प्रकरणांचा निपटारा आणि शासकीय योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीवर त्यांनी विशेष भर दिला. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी,



जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल, अपर जिल्हाधिकारी धनंजय गोगटे, प्रांताधिकारी उषाराणी देवगुणे, नंदुरबार तहसीलदार प्रदीप पवार यांच्यासह विविध यंत्रणांचे अधिकारी उपस्थित होते.

दौऱ्याची सुरुवात नांदरखेडा येथील आरोग्य उपकेंद्राच्या भेटीने झाली. येथे आरोग्य सेवांची पाहणी करताना गरोदर मातांचे लसीकरण, सिकलसेल रुग्णांच्या नोंदी आणि आरोग्यविषयक अभिलेखांची तपासणी करण्यात आली. सर्व नोंदी अद्ययावत व व्यवस्थित ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या. उच्च जोखीम (हाय रिस्क)

### कार्यालयांना भेट; आरोग्य, महसूल, भूमी अभिलेख, सेतू सेवा, गौण खनिज आणि लाभार्थी योजनांच्या अंमलबजावणीचा घेतला प्रत्यक्ष आढावा

असलेल्या गरोदर महिलांचे नियमित ट्रॅकिंग करून त्यांना वेळेवर तपासणी, औषधोपचार आणि आवश्यक आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याचे निर्देश श्री. खारगे यांनी दिले. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी आणि जिल्हा शल्यचिकित्सक यांनी समन्वय साधून अशा महिलांसाठी विशेष तपासणी शिबिरे आयोजित करावीत, असेही त्यांनी सांगितले. ● पान २ वर

# मुंबई उपनगरात अतिक्रमण निष्कासन मोहिमेत १४ एकर जमीन मोकळी

● मुंबई, विशाल कारंडे :

मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी मुंबई उपनगर जिल्ह्यातील शासकीय जमिनीवरील अनधिकृत अतिक्रमणे निष्कासन मोहिम, जिल्ह्यातील सर्व प्रशासकीय विभागाच्या समन्वयातून सुरु केली आहे. कुर्ला तालुक्यामधील मानखुर्द येथील ११ एकर शासकीय जागा अतिक्रमणमुक्त करून मुंबई मध्यवर्ती कारागृह प्रशासनाकडे सुपूर्द केल्यानंतर आता, या अतिक्रमण निष्कासन मोहीमेअंतर्गत ११ जून २०२६ रोजी, मौजे मानखुर्द, ता. कुर्ला



येथील नगर भूमापन क्रमांक १/१ तसेच मंडाळे येथील ६/१ व खाडीलगत शासकीय जागेवरील व्यवसायिक वापरली जाणारी अनधिकृत २२० गोडाऊन/गाळे इ. निष्कासित करुन एकूण १४ एकर शासकीय जमीन अतिक्रमण मुक्त केली. या मोहीमेमध्ये पोलीस उपायुक्त, परिमंडळ ६ समीर शेख यांनी सुरक्षा उपलब्ध करून दिली यामुळे निष्कासन मोहित यशस्वी पार पडली. ● पान २ वर

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी घेतला 'पुणे ग्रँड टूर' सायकल स्पर्धेच्या पूर्वतयारीचा आढावा

● पुणे, शकील शेख :

यावर्षी आयोजित केलेल्या पहिल्या 'पुणे ग्रँड टूर' सायकल स्पर्धेच्या यशस्वी आयोजनातून आपण एक आंतरराष्ट्रीय दर्जाचा उपक्रम उभा करण्याचे आव्हान अत्यंत कमी कालावधीत साध्य केले. आता पुढील वर्षीच्या दुसऱ्या पर्वाच्या आयोजनाच्या माध्यमातून या स्पर्धेची उंची, दर्जा, व्याप्ती आणि प्रभाव अजून पुढे न्यायचा असून नवा मापदंड निर्माण करण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन



उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले. तयारीचा आढावा व निर्णय घेण्यासाठी नियामक परिषद स्थापन करण्यात यावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित 'पुणे ग्रँड टूर' सायकल स्पर्धेच्या आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी पुणे जिल्हा परिषद अध्यक्ष वीरधवल जगदाळे, आमदार शंकर मांडेकर, विभागीय आयुक्त

### पुणे ग्रँड टूर स्पर्धेच्या अनुषंगाने नियामक परिषद स्थापन करावी - उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

शीतल तेली-उगले, पुणे शहर पोलिस आयुक्त अमितेश कुमार, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम, पिंपरी चिंचवड मनपा आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, क्रीडा व युवक सेवा आयुक्त दीपक सिंगला, पीएमआरडीएच्या अतिरिक्त आयुक्त मंजुलक्ष्मी के., अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल, ● पान २ वर

## () थोडक्यात ()

### दक्षिण मुंबई विभागातील अनधिकृत शाळा व वर्ग बंद करण्याचे निर्देश

मुंबई : दक्षिण मुंबई विभागातील काही शाळा व शाळांमधील काही वर्ग अनधिकृतरीत्या चालविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. या प्रकरणी संबंधित शाळांना नोटीस बजावून अनधिकृतरीत्या चालविण्यात येत असलेल्या शाळा व वर्ग तात्काळ बंद करण्याबाबत निर्देश दक्षिण मुंबई विभागाच्या शिक्षण निरीक्षक यांनी दिले आहेत. या सर्व शाळा इंग्रजी माध्यमाच्या आहेत. एकही वर्गास मान्यता नसलेल्या मुंबईतील अनधिकृत शाळांमध्ये मदनी हायस्कूल (क्रॉफर्ड मार्केट, मस्जीद), युसुफ मेहर अली हायस्कूल (नारायण तावडे चौक, तुळशीवाडी ताडदेव), मदर तेरेसा हायस्कूल (ब्लॉक नं 11, 90 फिट, धारावी), गणेश विद्यामंदीर (संत कक्कैया मार्ग, धारावी), ऑक्झिलम इंटरनॅशनल स्कूल (बलराम बाबू खाडेकर मार्ग, वडाळा पूर्व) फिनलँड इंटरनॅशनल स्कूल (माहेश्वरी निकेतन, गोपालराव देशमुख मार्ग) यांचा समावेश आहे.

### शहीद जवान अर्जुन जाधव यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात शहापूर येथे अंत्यसंस्कार

सातारा : शहीद जवान अर्जुन जाधव यांच्या पार्थिवावर आज शहापूर ता. कराड येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. पोलीस दल व भारतीय सैन्य दलाच्या तुकडीने हवेत बंदुकींच्या फैरी झाडून तसेच अंतिम बिगुल वाजवून शहीद जवानास मानवंदना दिली. यावेळी आमदार मनोज घोरपडे, आमदार डॉ. अतुल भोसले, माजी आमदार बाळासाहेब पाटील, जिल्हाधिकारी संतोष पाटील, प्रांताधिकारी अतुल म्हेत्रे, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ओमकार कापले, गटशिक्षणाधिकारी प्रताप पाटील यांच्या सह विविध विभागाचे अधिकारी व लोकप्रतिनिधी यांनी शहीद जवान अर्जुन जाधव यांना पुष्पचक्र अर्पण करून मानवंदना दिली.

### कटफळ येथे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा सुविधा विकसित करा– उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

पुणे : बारामती तालुक्यातील कटफळ येथे २० एकर जागेत आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा सुविधा विकसित करण्यात येत आहे. क्रीडा सुविधा विकसित करताना सर्व क्रीडा प्रकारांचा समावेश करण्यात यावा, या ठिकाणी राष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा स्पर्धा आयोजित होतील, यादृष्टीनेही कामे करावीत, असे निर्देश राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिले.

# फुटबॉलचा जागतिक महोत्सव

फिफा विश्वचषक हा जगातील सर्वाधिक लोकप्रिय आणि भव्य क्रीडा सोहळ्यांपैकी एक मानला जातो. दर चार वर्षांनी रंगणाऱ्या या स्पर्धेकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागलेले असते. विश्वचषकाचा प्रारंभ होताच जगभरातील कोट्यवधी चाहते फुटबॉलच्या उत्साहात रंगून जातात. दूरचित्रवाणी, डिजिटल माध्यमे आणि विविध प्रसारण मंचांद्वारे सुमारे ३५० कोटी लोक या स्पर्धेचा आनंद घेतात. मैदानावरील एखादा संस्मरणीय क्षण खेळाडूला महानतेच्या शिखरावर पोहोचवू शकतो, तर एखादी चूक त्याच्यासह संपूर्ण राष्ट्राच्या स्वप्नांवर पाणी फेरू शकते. त्यामुळे फिफा विश्वचषक हा केवळ खेळ नसून जगभरातील विविध भाषा, संस्कृती, धर्म आणि परंपरांना एका भावनेत बांधणारा उत्सव ठरतो.

युद्धे, राजकीय तणाव, आर्थिक संकटे आणि सामाजिक मतभेद अशा अनेक आव्हानात्मक काळातही फुटबॉलने जगाला एकत्र आणण्याची विलक्षण ताकद दाखवून दिली आहे. २०२६ चा फिफा विश्वचषक १९ जुलैपर्यंत चालणार असून या स्पर्धेत प्रथमच ४८ देश सहभागी होत आहेत. अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको हे या स्पर्धेचे यजमान देश आहेत. याआधी विश्वचषकात ६४ सामने खेळवले जात असत; मात्र यंदा १०४ सामने होणार असून स्पर्धेचा कालावधी ३९ दिवसांचा आहे. एकूण १,२४८ खेळाडू या स्पर्धेत सहभागी होत असून हा देखील एक विक्रम मानला जात आहे.

फेडरेशन इंटरनॅशनल डी फुटबॉल असोसिएशन अर्थात 'फिफा'ची स्थापना २१ मे १९०४ रोजी झाली. स्वित्झर्लंडमधील झुरिच येथे या संस्थेचे मुख्यालय आहे. आज २०० हून अधिक देश या संघटनेशी संलग्न आहेत. फिफा विश्वचषक हा राष्ट्रीय संघांमधील सर्वात प्रतिष्ठेचा फुटबॉल स्पर्धा प्रकार आहे.

राष्ट्रीय संघांच्या विश्वचषकाबरोबरच क्लब स्तरावर 'फिफा क्लब विश्वचषक' ही स्वतंत्र स्पर्धा खेळवली जाते. भारत हा फिफाचा सक्रिय सदस्य असला, तरी जागतिक क्रमवारीतील घसरण आणि पात्रता फेरीतील अपुऱ्या कामगिरीमुळे भारतीय संघाला अद्याप मुख्य विश्वचषकात स्थान मिळवता आलेले नाही.

१९३० आणि १९३४ मधील पहिल्या दोन विश्वचषक स्पर्धांमध्ये फक्त १३ ते १६ संघ सहभागी झाले होते. त्यानंतर १९८२ ते १९९४ या काळात सहभागी देशांची संख्या २४ झाली. १९९८ ते २०२२ दरम्यान ३२ देशांना संधी मिळाली, तर आता ती वाढून ४८ झाली आहे. जगभरातील देशांचे फिफाने विविध खंडीय महासंघांमध्ये विभाजन केले आहे. आशिया, युरोप, दक्षिण अमेरिका, उत्तर अमेरिका, आफ्रिका आणि ओशनिया अशा महासंघांअंतर्गत पात्रता फेऱ्या आयोजित केल्या जातात आणि त्यातून विश्वचषकासाठी संघ निवडले जातात.

यंदाच्या स्पर्धेत स्पेन, फ्रान्स, पोर्तुगाल, इंग्लंड आणि गतविजेता अर्जेंटिना यांना विजेतेपदाचे प्रमुख दावेदार मानले जात आहे. ब्राझीलचा संघ सध्या अपेक्षित कामगिरी करत नसला तरी त्यांना दुर्लक्षित करणे धोक्याचे ठरू शकते. भारतात जसे क्रिकेटला विशेष स्थान आहे, तसेच ब्राझीलमध्ये फुटबॉलला आहे. तेथील मुलांना चालण्याआधी फुटबॉलशी मैत्री होते, असे म्हटले जाते. विश्वचषकाच्या इतिहासात ब्राझीलने सर्वाधिक पाच वेळा विजेतेपद पटकावले आहे.

फुटबॉलच्या लोकप्रियतेमागील सर्वात मोठे कारण म्हणजे त्याचा साधेपणा. या खेळासाठी महागडी साधने आवश्यक नसतात. एक चेंडू, मोकळी जागा आणि खेळाची आवड असलेले खेळाडू एवढेच पुरेसे असते. त्यामुळे हा खेळ जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचला आहे.

विश्वचषकाने अनेक अविस्मरणीय क्षण दिले आहेत. १९८६ मध्ये दिएगो मॅराडोनाने इंग्लंडविरुद्ध केलेला 'हँड ऑफ गॉड' गोल आजही चर्चेत असतो. तसेच एका अंतिम सामन्यात फ्रान्सचा दिग्गज कर्णधार झिनेदिन झिदान याने इटलीच्या मार्को मॅटरेझीला दिलेला हेडबट फुटबॉल इतिहासातील सर्वाधिक नाट्यमय घटनांपैकी एक मानला जातो. त्या प्रसंगामुळे झिदानला मैदानाबाहेर जावे लागले आणि फ्रान्सच्या विजयाच्या आशांनाही धक्का बसला. त्यामुळे विश्वचषकातील प्रत्येक क्षण इतिहास घडवण्याची क्षमता ठेवतो.

फुटबॉलची एकात्मतेची ताकद पहिल्या महायुद्धादरम्यानही दिसून आली होती. १९१४ च्या ख्रिसमस दिवशी पश्चिम आघाडीवरील ब्रिटिश आणि जर्मन सैनिकांनी काही काळासाठी युद्धविराम जाहीर करून एकत्र फुटबॉल खेळल्याची घटना आजही मानवतेच्या विजयाचे प्रतीक मानली जाते. त्या काही तासांत शस्त्रांपेक्षा माणुसकीला अधिक महत्त्व मिळाले होते.

फिफाच्या अंदाजानुसार जगभरातील पाच अब्जांहून अधिक लोक फुटबॉलशी थेट किंवा अप्रत्यक्षपणे जोडलेले आहेत. २०२२ मधील कतार विश्वचषकाची अंतिम लढत सुमारे १.५ अब्ज लोकांनी पाहिली होती, तर संपूर्ण स्पर्धेचे प्रसारण पाच अब्ज प्रेक्षकांपर्यंत पोहोचल्याचा दावा करण्यात आला आहे.

विश्वचषकाचा प्रभाव केवळ खेळापुरता मर्यादित नसतो. पर्यटन, हॉटेल उद्योग, वाहतूक, जाहिरात आणि प्रसारण क्षेत्रांना या स्पर्धेमुळे मोठी चालना मिळते. फिफा ही स्वत: अब्जावधी डॉलर्सची उलाढाल करणारी संस्था आहे. युरोपातील प्रमुख फुटबॉल लीग्सची आर्थिक ताकद अनेक देशांच्या अर्थसंकल्पाशी स्पर्धा करणारी आहे. २०२२ च्या कतार विश्वचषकासाठी २०० अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक खर्च झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला होता .अलिकडच्या काळात विश्वचषकाच्या पर्यावरणीय परिणामांवरही चर्चा वाढली आहे. लाखो प्रेक्षकांच्या प्रवासामुळे कार्बन उत्सर्जन वाढते, विशाल स्टेडियम उभारण्यासाठी मोठ्या प्रमाणात संसाधने वापरली जातात आणि ऊर्जा वापरातही वाढ होते. या पार्श्वभूमीवर 'ग्रीन वर्ल्डकप' ही संकल्पना पुढे येत आहे. अक्षय ऊर्जेचा वापर, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा विस्तार आणि कार्बन ऑफसेट उपक्रमांच्या माध्यमातून अधिक पर्यावरणपूरक स्पर्धा आयोजित करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

सोशल मीडिया आणि डिजिटल तंत्रज्ञानामुळे फुटबॉलची व्याप्ती आणखी वाढली आहे. लिओनेल मेस्सी, ख्रिस्तियानो रोनाल्डो आणि किलियन एम्बापे यांसारख्या खेळाडूंचे सामाजिक माध्यमांवरील अनुयायी अनेक देशांच्या लोकसंख्येपेक्षाही अधिक आहेत. त्यांच्या प्रत्येक गोलवर, प्रतिक्रियेवर आणि निर्णयावर जगभर चर्चा रंगते.

आज फुटबॉल हा फक्त एक खेळ राहिलेला नाही. तो संस्कृतीचा भाग आहे, अर्थकारणाशी जोडलेला आहे, राजकारणावर प्रभाव टाकतो आणि मनोरंजन क्षेत्रातील महत्त्वाचा घटक बनला आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे तो भावनांचा अथांग सागर आहे. हा खेळ लोकांना आनंद देतो, प्रेरणा देतो, कधी डोळे पाणावतो आणि अनेकदा राष्ट्रांच्या सामूहिक स्मृतींचा भाग बनतो.

म्हणूनच फिफा विश्वचषक ही केवळ क्रीडा स्पर्धा नसून मानवजातीच्या एकात्मतेचा आणि उत्सवप्रियतेचा सर्वात मोठा जागतिक मंच मानला जातो. काळ बदलत राहील, तंत्रज्ञान नवे आयाम गाठत राहील, जगात विविध आव्हाने उभी राहतील; परंतु फुटबॉलच्या एका गोलमधून निर्माण होणारा आनंद आणि त्यातून उमटणारी जागतिक ऐक्याची भावना कायम तितकीच प्रभावी राहील.

– अनिकेत घनश्याम भंकाळ

संपादकीय

## पान १ वरुन

### धुळे – नंदुरबारला राज्याच्या विकासाचे...

**अण्णासाहेबांचे कार्य म्हणजे परिवर्तनाचा इतिहास**

दिवंगत अण्णासाहेब चुडामण पाटील यांचे जीवन म्हणजे संघर्ष, राष्ट्रनिष्ठा आणि समाजसेवेचा प्रेरणादायी प्रवास असल्याचे सांगत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आर्थिक संकटामुळे गिरणीत नोकरी स्वीकारलेल्या अण्णासाहेबांनी अन्यायाविरोधात लढा उभारला. स्वातंत्र्यलढ्यात मिठाचा सत्याग्रह, जंगल सत्याग्रह आणि 'चले जाव' आंदोलनात सहभाग घेत दोन वर्षांचा कारावास भोगला. महात्मा गांधी, लोकमान्य टिळक आणि पंडित नेहरू यांच्या विचारांचा त्यांच्यावर प्रभाव होता. त्यांना स्वत:ला शिक्षण घेता आले नाही, मात्र समाजातील मुलांना शिक्षणाची संधी मिळावी यासाठी त्यांनी शिक्षण संस्थांची उभारणी केली. शाळा, महाविद्यालये, तसेच पुढे वैद्यकीय आणि अभियांत्रिकी शिक्षण संस्थांचे जाळे उभे राहिले. अण्णासाहेबांनी रोवलेले हे बीज पुढील पिढ्यांनी जोपासत मोठा विस्तार घडवून आणल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

**लोकांच्या मनावर राज्य करणारे 'अजिंक्य' नेतृत्व**

अण्णासाहेब सलग तीन वेळा लोकसभेवर निवडून आले. मात्र 'अजिंक्य' ही उपाधी त्यांना केवळ निवडणूक विजयांमुळे मिळालेली नाही. शिक्षण, सहकार, राजकारण आणि सामाजिक क्षेत्रात त्यांनी उभारलेले कार्य, जोडलेली माणसे आणि लोकांच्या मनात निर्माण केलेला विश्वास हेच त्यांच्या अजिंक्यत्वाचे खरे कारण असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

**चांगल्या कार्याचे दस्तावेजीकरण काळाची गरज**

समाजात आदर्श निर्माण करणाऱ्या व्यक्तींचे कार्य पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्याचे दस्तावेजीकरण होणे आवश्यक असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. 'अजिंक्य' हा चरित्रग्रंथ केवळ अण्णासाहेबांच्या जीवनाचा आलेख नसून धुळे जिल्ह्याच्या सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय इतिहासाचाही महत्त्वपूर्ण दस्तावेज आहे, असे त्यांनी नमूद केले.

**धुळे ही 'नररत्नांची खाण'**

धुळे जिल्ह्याने विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणारी अनेक व्यक्तिमत्वे महाराष्ट्राला दिली आहेत. या जिल्ह्यातील क्षमता आणि कर्तृत्व पाहता हा जिल्हा 'नररत्नांची खाण' असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. आमदार अमरीश पटेल यांच्यासारख्या उद्योजकांनी ग्रामीण भागात उभे केलेले विकास मॉडेलही प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

**भावी पिढ्यांना प्रेरणा देणारा ग्रंथ**

'अजिंक्य' या चरित्रग्रंथातून संघर्ष, नेतृत्व, राष्ट्रप्रेम आणि समाजसेवेची प्रेरणा मिळेल. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी इच्छाशक्ती, दूरदृष्टी आणि समाजहिताची भावना असेल तर मोठे परिवर्तन घडविता येते, हा संदेश अण्णासाहेबांच्या जीवनातून मिळतो. त्यामुळे हा ग्रंथ धुळे जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील युवकांसाठी प्रेरणास्रोत ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कुणाल पाटील यांनी केले.यावेळी लेखकाच्या पत्नी इंदुमती सोमनाथ पाटील यांचा मुख्यमंत्री यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

### संत्रा निर्यातीवरील अनुदान...

मिळालेल्या माहितीनुसार, ही योजना प्रामुख्याने केवळ काही व्यापाऱ्यांच्या फायद्याची ठरत असल्याचे सरकारच्या निदर्शनास आले होते. त्याव्यतिरिक्त, भारत आणि बांगलादेशातील बिघडलेल्या संबंधांमुळे आयात-निर्यात व्यवहारांवरही प्रतिकूल परिणाम झाला आहे.

**कांद्याची निर्यातही घटली :** महाराष्ट्र मोठ्या प्रमाणावर बांगलादेशला कांद्याची निर्यात करत असे, मात्र आता त्या निर्यातीतही मोठी घट झाली आहे. महाराष्ट्राकडून कांद्याचे बियाणे मिळवल्यानंतर, बांगलादेशने आता स्वत:हून कांद्याची लागवड सुरू केली आहे, ज्याचा फटका राज्यातील शेतकऱ्यांना बसत आहे. या सर्व परिस्थितीचा विचार करता, प्रोत्साहनपर अनुदानाच्या माध्यमातून संत्रा निर्यातीला चालना देण्याचे औचित्य उरले नसल्याचे सूत्रांनी सांगितले.

### १ ऑगस्टपासून महिला व ज्येष्ठ...

दरम्यान, स्मार्ट कार्डच्या वितरणामध्ये कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार खपवून घेतला जाणार नसल्याचे मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले आहे. विहित शुल्कापेक्षा अधिक रक्कम आकारून स्मार्ट कार्डची विक्री करणाऱ्या वितरण केंद्रांवर कठोर कारवाई करण्यात येणार असून अशा केंद्रांचा वितरण परवाना तत्काळ रद्द करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले आहे.

महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिकांना शासनाच्या विविध प्रवासी सवलतींचा लाभ सुरळीतपणे मिळावा, तिकीट वितरण प्रक्रियेत पारदर्शकता यावी आणि प्रवास व्यवस्थापन अधिक आधुनिक व्हावे, या उद्देशाने स्मार्ट कार्ड प्रणाली राबविण्यात येत आहे. त्यामुळे संबंधित लाभार्थ्यांनी १ ऑगस्टपूर्वी आपले स्मार्ट कार्ड प्राप्त करून ते कार्यान्वित करून घ्यावे, असे आवाहन परिवहन मंत्री सरनाईक यांनी केले आहे.

### शासनाच्या योजना कागदावर नव्हे...

आष्टे येथे स्थानिक लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थांशी संवाद साधण्यात आला. यावेळी लोकप्रतिनिधींनी विविध विकासकामांबाबत मागण्या मांडल्या. यावेळी महसूल प्रशासन हे लोकाभिमुख असून नागरिकांच्या समस्या सोडविणे आणि विकासकामांना गती देणे ही प्रशासनाची प्राथमिकता असल्याचे श्री. खारगे यांनी स्पष्ट केले.

त्यानंतर आष्टे येथील ग्राम महसूल अधिकारी कार्यालयाला भेट देऊन महसुली अभिलेख, शासकीय जमिनींच्या नोंदी तसेच त्यांवरील अतिक्रमणांची माहिती घेण्यात आली. सर्व दस्तावेज, अभिलेख आणि नोंदी व्यवस्थित व अद्ययावत ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या. नागरिकांना विविध दाखले वेळेत मिळावेत यासाठी दाखले देण्याचे तसेच प्रतिज्ञापत्र मान्य करण्याचे अधिकार मंडळ अधिकारी स्तरावर देण्याबाबतची मागणी यावेळी करण्यात आली. सध्या हे अधिकार तहसीलदार स्तरावर असल्याने अनेक प्रकरणे प्रलंबित राहतात. त्यामुळे नागरिकांना अधिक जलद सेवा मिळण्याच्या दृष्टीने या मागणीबाबत सकारात्मक विचार करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. यानंतर मंडळ अधिकारी कार्यालय, आष्टे येथे भेट देऊन क्षेत्रीय महसूल कामकाजाचा आढावा घेण्यात आला. अभिलेख व्यवस्थापन, नोंदी अद्ययावत ठेवणे आणि नागरिकांच्या प्रकरणांचा वेळेत निपटारा करण्याबाबत आवश्यक सूचना देण्यात आल्या. दौऱ्यादरम्यान वाघाळे येथे भेट देऊन आपली अभ्यासिका प्रकल्पाची पाहणी करण्यात आली. प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा घेत कामांमध्ये आवश्यक गती राखण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना करण्यात आल्या.

यानंतर नंदुरबार येथे तहसील कार्यालयाला भेट देण्यात आली. येथे टपाल व्यवस्थेची माहिती घेऊन कार्यालयीन पत्रव्यवहार, प्रकरणांची हाताळणी आणि निपटाऱ्याच्या प्रक्रियेचा आढावा घेण्यात आला. तसेच गौण खनिजाशी संबंधित कामकाज, नियंत्रण यंत्रणा आणि अंमलबजावणीबाबत अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेण्यात आली. संजय गांधी निराधार योजनेतील काही लाभार्थ्यांशी प्रत्यक्ष दूरध्वनीवरून संवाद साधण्यात आला. लाभार्थ्यांना योजनेचा लाभ नियमितपणे मिळत आहे का, याची खातरजमा करण्यात आली. तसेच त्यांना येणाऱ्या अडचणी जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या. शासनाच्या योजनांचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणे हीच प्रशासनाच्या कामकाजाची खरी कसोटी असल्याचे श्री. खारगे यांनी यावेळी नमूद केले. त्यानंतर सेतू सुविधा केंद्र, नंदुरबार येथे भेट देऊन नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या विविध सेवांची पाहणी करण्यात आली. दाखले, प्रमाणपत्रे आणि इतर सेवांचा निपटारा वेळेत होत आहे का, याची माहिती घेऊन सेवा वितरण अधिक गतिमान करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

दुय्यम निबंधक कार्यालय, नंदुरबार येथे भेट देऊन दस्त नोंदणी, दस्तऐवज व्यवस्थापन आणि नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या सेवांचा आढावा घेण्यात आला. तसेच उपविभागीय अधिकारी कार्यालय, नंदुरबार येथे भेट देऊन विविध महसुली प्रकरणे, प्रलंबित कामे आणि प्रशासनिक कार्यपद्धतीची माहिती घेण्यात आली. याशिवाय उपअधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, नंदुरबार येथे भेट देऊन जमीन अभिलेखांचे संगणकीकरण, नकाशे, मोजणी प्रकरणे आणि नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांचा आढावा घेण्यात आला. भूमी अभिलेखाशी संबंधित प्रकरणे पारदर्शकपणे आणि वेळेत निकाली काढण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

दिवसभराच्या दौऱ्यात आरोग्य, महसूल, भूमी अभिलेख, नोंदणी, सेतू सेवा, गौण खनिज आणि सामाजिक सुरक्षा योजनांच्या अंमलबजावणीची प्रत्यक्ष पाहणी करून श्री. खारगे यांनी नागरिककेंद्रित प्रशासन, उत्तरदायित्व आणि सेवा वितरणाची गुणवत्ता वाढविण्यावर भर दिला. शासनाच्या सेवा आणि योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत प्रभावीपणे पोहोचावा, यासाठी सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने आणि संवेदनशीलतेने काम करावे, असे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

### मुंबई उपनगरात अतिक्रमण निष्कासन...

निष्कासन मोहिम अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का) पूर्व उपनगरे, उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) चेंबूर, उपविभागीय अधिकारी (पूर्व उपनगरे), बृहन्मुंबई महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त (एम/पूर्व), तहसिलदार कुर्ला, सार्वजनिक बांधकाम विभाग, नगर भूमापन अधिकारी, चेंबूर व इतर प्रशासकीय विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्या सहाय्याने करण्यात आली.

ही कारवाई शांततेत व सुरळीत पार पाडण्यासाठी पोलीस विभागाचे सुमारे ६०० अधिकारी व कर्मचारी, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे १५० कर्मचारी, महसूल विभागाचे १०० अधिकारी व कर्मचारी, नगर भूमापन विभागाचे १० अधिकारी-कर्मचारी तैनात करण्यात आले होते. तसेच अतिक्रमण हटविण्यासाठी ३ पोकलेन यंत्रे व ४ जेसीबी यंत्रांचा वापर करण्यात आला. संबंधित जागा संरक्षित करुन शासनाच्या धोरणानुसार, शासकीय प्रकल्प/विभाग यांना देण्यासाठी तात्काळ कार्यवाही केली जाणार आहे.

प्रशासनाच्या समन्वयातून आणि महसूल विभागाच्या प्रभावी कारवाईमुळे मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण हटवून ही महत्त्वाची शासकीय जमीन ताब्यात घेण्यात यश आले आहे. मुंबई उपनगर जिल्ह्यातील इतर शासकीय जमिनींवरील अतिक्रमणे हटवण्यासाठीही अशाच प्रकारची विशेष मोहीम तीव्र गतीने राबवली जाईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

### उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार...

सीएफआयचे महासचिव मनिंदर पाल सिंह (दूरदृष्य प्रणालीद्वारे) आदी उपस्थित होते.

ग्रँड टूर २०२७ चे उद्दिष्ट केवळ गेल्या वर्षाची पुनरावृत्ती करणे एवढेच नसल्याचे सांगून उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या, अगदी शहरापासून ग्रामीण भागापर्यंत, तळागाळापर्यंत ही स्पर्धा पोहोचलेल्या गतवर्षीच्या 'पुणे ग्रँड टूर'चा आनंद सर्वांनी घेतला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पाठबळाने ही स्पर्धा यशस्वीरीत्या आयोजित करण्यात आली. या ग्रँड टूरची संकल्पना, त्यामागील दूरदृष्टी आणि उपक्रम प्रत्यक्षात आणण्याचा पाया तत्कालीन उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित पवार यांनी रचला. पुणे हे केवळ शैक्षणिक, औद्योगिक आणि सांस्कृतिक केंद्र न राहता जागतिक दर्जाच्या क्रीडा स्पर्धांचे केंद्र बनावं, महाराष्ट्रातील युवकांना सायकलिंगसारख्या उत्कृष्ट क्रीडा प्रकारांसाठी व्यासपीठ मिळावे आणि पुण्याचे आंतरराष्ट्रीय क्रीडा नकाशावर आपले वेगळे स्थान निर्माण व्हावे ही त्यांची दूरदृष्टी होती, असेही त्या म्हणाल्या.

सर्व विभाग, अधिकारी, कर्मचारी, स्थानिक प्रशासन, पोलीस यंत्रणा, स्वयंसेवक आणि सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे पदाधिकारी आदी अनेक यंत्रणा, विभाग, विविध भागधारक यांनी मर्यादित कालावधीमध्ये एकत्र येऊन अतिशय उत्तमरित्या काम केल्याने ही अतिशय सुंदर अशी स्पर्धा पार पडली, असेही त्या म्हणाल्या. आगामी स्पर्धेमुळेही आपल्या ऐतिहासिक वास्तू, ऐतिहासिक स्थळे जगाच्या पटलावर येऊन पर्यटनाला चालना मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

आगामी स्पर्धेसाठी राज्य शासन, स्थानिक स्वराज्य संस्था व नागरी संस्था आणि सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाची नियामक परिषद (गव्हर्निंग कौन्सिल) स्थापन करण्यात यावी. गव्हर्निंग कौन्सिलने दरमहा बैठक घेऊन तयारीचा प्रगतीचा आढावा घ्यावा. ही परिषद पुणे टूरची सर्वोच्च धोरणात्मक आणि देखरेख करणारी संस्था असावी. त्यासोबतच आयोजन समितीही स्थापन करण्यात यावी, असेही त्या म्हणाल्या. त्यात प्रत्येक समिती, प्रत्येक विभाग आणि प्रत्येक अधिकाऱ्याच्या भूमिका, जबाबदाऱ्या, अधिकार स्पष्टपणे निश्चित करण्यात याव्यात, असेही त्यांनी सांगितले.

स्पर्धेच्या आयोजनासाठी राज्य शासनाकडून निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही. परंतु, यावर्षीच्या स्पर्धेचे क्षेत्र मोठे असून स्पर्धेच्या निधीसाठी सर्व महानगरपालिका तसेच अन्य यंत्रणांना सहभागी करुन घेणे आवश्यक आहे, असेही मत त्यांनी मांडले. विभागीय आयुक्त श्रीमती तेली- उगले म्हणाल्या, या स्पर्धेसाठी स्वच्छता ही आपली सामाजिक जबाबदारी म्हणून ती हाती घेतली पाहिजे. स्पर्धा जाणाऱ्या गावातील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प बाबत प्रायोगिक तत्त्वावर राबविले पाहिजेत. त्यासाठी कचऱ्याचे घनीकरण (कॉम्पॅक्टिंग) करण्याचे प्रकल्प राबवून तो कचरा जवळच्या शहरांच्या कचरा डेपोंना पाठवता येऊ शकतात. स्पर्धेसाठी इको टुरिझम अंतर्गत बांबूच्या वस्तू तयार करून वापर करता येईल, असेही त्या म्हणाल्या.

पोलीस आयुक्त श्री. अमितेश कुमार म्हणाले, गतवेळच्या स्पर्धेसाठी पोलीस दलाला मोठ्या प्रमाणात साहित्य, वाहने वेळेत उपलब्ध करून देण्यात आली. यावर्षीच्या स्पर्धेत अजून लोकांचा सहभाग वाढेल असे प्रयत्न आहेत. स्पर्धेच्या शेवटच्या टप्प्याचा दिवस सुटीचा असल्याने वाहतूक नियमन करणे सोपे होणार आहे, असेही ते म्हणाले. मनपा आयुक्त श्री. राम, डॉ. सूर्यवंशी आदींनी माहिती दिली.

यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी स्पर्धेच्या अनुषंगाने सादरीकरण केले. गतवेळी अत्यंत कमी कालावधीच्या तयारीत ही आंतरराष्ट्रीय दर्जाची स्पर्धा आयोजित करण्यात आली. येथील गड-किल्ले, ऐतिहासिक वारसा, पर्यटनस्थळे या स्पर्धेमुळे जागतिक नकाशावर पोहोचली. अत्यंत यशस्वीरित्या व सुरक्षित स्पर्धा आयोजित केल्यामुळे 'युनियन सायकलिस्ट इंटरनॅशनल' (युसीआय) या जागतिक संघटनेने आगामी स्पर्धेचा दर्जा युसीआय २.२ वरून २.१ असा उन्नत केला आहे. गतवर्षीच्या ४च्या तुलनेत यावर्षी स्पर्धेचे ६ टप्पे असणार असून १ हजार ९९ कि.मी.ची ही स्पर्धा असणार आहे, असे त्यांनी सांगितले.

बैठकीत, गतवर्षी अतिशय चांगले आयोजन केल्याबद्दल प्रातिनिधिक स्वरूपात अंमलबजावणी यंत्रणांचा सत्कार करण्यात

## नवी मुंबईत मेट्रो जाळे विस्तारणार

**नवी मुंबई (भावना जैन) :** नवी मुंबईच्या वाहतूक पायाभूत सुविधांना मोठी चालना देणारा निर्णय घेत महाराष्ट्र शासनाने सिडकोच्या नवी मुंबई मेट्रो नेटवर्क विस्ताराच्या महत्त्वाकांक्षी प्रस्तावास मंजुरी दिली आहे. या अंतर्गत नवी मुंबई मेट्रो लाईन १ ए आणि लाईन २ विकसित करण्यात येणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत या प्रकल्पास मान्यता देण्यात आली.मुंबई महानगर प्रदेशासाठी (एमएमआर) तयार करण्यात आलेल्या सर्वसमावेशक वाहतूक अभ्यास अहवालांतर्गत प्रस्तावित मास रॅपिड ट्रान्झिट सिस्टिमचा हा महत्त्वाचा भाग आहे. नोव्हेंबर २०२३ मध्ये नवी मुंबई मेट्रो लाईन १ यशस्वीरित्या सुरू झाल्यानंतर सिडकोने मेट्रो विस्ताराच्या पुढील टप्प्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून तो महाराष्ट्र शासनाकडे सादर केला होता.प्रस्तावित मेट्रो लाईन १ ए हा ३.२ कि.मी. लांबीचा उन्नत मार्ग असून तो सीबीडी बेलापूर ते सागर संगम या दरम्यान दोन स्थानकांसह विकसित करण्यात येणार आहे. या मार्गाला प्रस्तावित गोल्ड लाईन (मेट्रो लाईन ८) शी आंतरजोडणी देण्यात येणार असून, त्यामुळे नवी मुंबईच्या पश्चिम भागातून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंत अखंड आणि सुलभ प्रवास शक्य होणार आहे.तसेच १४.०७ कि.मी. लांबीची मेट्रो लाईन २ ही पेंधर ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ टर्मिनल-४ दरम्यान ११ स्थानकांसह विकसित करण्यात येणार आहे. हा मार्ग विमानतळ परिसरातील वेगाने विकसित होत असलेल्या क्षेत्रांना तसेच एमआयडीसी भागाला महत्त्वपूर्ण सार्वजनिक वाहतूक सुविधा उपलब्ध करून देईल.याशिवाय, एमएमआरडीएतर्फे विकसित करण्यात येत असलेल्या कल्याण-तळोजा मेट्रो लाईन १२ शी तळोजा येथील अमनदूत स्थानकावर आंतरजोडणी प्रस्तावित असून, त्यामुळे मुंबई महानगर प्रदेशाच्या पूर्वेकडील भागांनाही या मेट्रो नेटवर्कचा लाभ मिळणार आहे कार्यक्षमता वाढविणे आणि प्रवाशांना अखंड प्रवासाचा अनुभव देणे या उद्देशाने मेट्रो लाईन 1 ए आणि लाईन २ यांचे विद्यमान ११ कि.मी. लांबीच्या नवी मुंबई मेट्रो लाईन १ सोबत एकत्रीकरण करण्यात येणार आहे. त्यामुळे सागर संगम ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ असा सुमारे २८ कि.मी. लांबीचा सलग आणि एकात्मिक मेट्रो मार्ग तयार होणार आहे.

Printed, Published and Owned by Rakesh Shankar Gore and Printed at Somani Printing Press, Unit no.04, Ground Floor, N.K. Industrial Estate, off. Aarey Road, near Pravasi Ind. Estate, Gate no.2, Goregaon (east) Mumbai-400063, and Published at Shop no. १२, B-2, Sai Dham Shopping Center, Mangal Nagar,१५ No. Last Bus Stop, Near G.C.C. Club, Mira Road (east), Dist: Thane-401107, Maharashtra. Editor- Rakesh Shankar Gore. RNI REG. No: MAHBIL/2023/86118. Office Contact no. 9702386118, Email: dainiklokrakshanay@gmail.com, Website: www.lokrakshanay.com (ठाणे न्याय कक्षेत)

# स्वतंत्र पडताळणीचे वनमंत्र्यांचे निर्देश

## फ्लेमिंगोंचा विमान वाहतुकीला धोका असल्याची शक्यता

नवी मुंबई (भावना जैन) : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरातील फ्लेमिंगो अधिवास आणि पाणथळ क्षेत्रे विमान वाहतुकीसाठी धोकादायक ठरू शकतात, असा निष्कर्ष मांडण्यासाठी काही शासकीय यंत्रणा खासगी संस्थेच्या अभ्यासाचा आधार घेत असताना, राज्याच्या वन विभागाने मात्र या दाव्यांची तज्ज्ञ संस्थांमार्फत पडताळणी करण्याचे निर्देश दिले.

डीपीएस, एनआरआय तलाव आणि इतर फ्लेमिंगो अधिवास क्षेत्रांमध्ये होत असल्याच्या कथित छेडछाडीबाबत वनमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच झालेल्या मंत्रालयातील बैठकीत सालिम अली सेंटर फॉर ऑर्निथॉलॉजी अँड नॅचरल हिस्ट्री (SACON) आणि वाइल्डलाइफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया (WII) या देशातील अग्रगण्य तज्ज्ञ संस्थांकडून सविस्तर अभ्यास करण्याचे निर्देश देण्यात आले. त्यामुळे विमानतळ सुरक्षा आणि पर्यावरण संवर्धन यांच्यातील संघर्ष नव्या टप्प्यावर पोहोचला आहे.

नवी मुंबईतील डीपीएस आणि एनआरआय तलाव परिसर गेल्या अनेक वर्षांपासून फ्लेमिंगो आणि इतर स्थलांतरित पक्ष्यांचे महत्त्वाचे अधिवास मानले जातात. विमानतळातून उड्डाण करणाऱ्या विमानांना पक्ष्यांच्या हालचालींमुळे 'बर्ड स्ट्राईक' चा धोका निर्माण होऊ शकतो, या भूमिकेचा आधार घेत काही शासकीय यंत्रणांनी खासगी संस्थेकडून अभ्यास करून घेतल्याची माहिती बैठकीत चर्चेत आली. मात्र, वन विभागाने केवळ एका अहवालाच्या आधारे निर्णय घेण्याऐवजी संपूर्ण विषयाचा वैज्ञानिक पद्धतीने पुनर्विचार करण्याचा मार्ग स्वीकारला आहे.

मंत्रालयात वनमंत्री गणेश नाईक यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे आणि संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांसमवेत फ्लेमिंगो पक्ष्यांचे अधिवास, जलप्रवाहांची स्थिती, पाण्याची गुणवत्ता, जैवविविधता आणि परिसरातील विकासकामांचा संभाव्य परिणाम यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.



बैठकीत फ्लेमिंगो पक्ष्यांच्या उड्डाणाची उंची आणि विमानांच्या उड्डाण मार्गांतील अंतर याचाही विचार करण्यात आला. संबंधित पाणथळ क्षेत्रे विमानतळापासून काही अंतरावर असून नवी मुंबईची 'फ्लेमिंगो सिटी' म्हणून निर्माण झालेली ओळख जपणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. विमान वाहतुकीची सुरक्षितता आणि पर्यावरण संवर्धन या दोन्ही बाबींमध्ये समतोल राखत पुढील निर्णय घेण्याची आवश्यकता बैठकीत अधोरेखित करण्यात आली. दोन्ही संस्थांचा अभ्यास अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यातील निष्कर्ष व शिफारशींच्या आधारे पुढील निर्णय घेतला जाणार आहे.

> “परंतु, खासगी संस्थांचे अहवाल पुढे करून हरित लवादाची दिशाभूल करत हे पाणथळ भाग खासगी विकासकांच्या घशात घालण्याचा डाव असल्याचे आरोप पर्यावरणप्रेमींनी केले. त्यामुळे शासकीय संस्था आणि पर्यावरणप्रेमींमधील संघर्ष तीव्र झाला. नवी मुंबईतील फ्लेमिंगो आणि इतर पक्ष्यांचा अधिवास टिकायला हवा, असे वन विभागाचे ठाम मत आहे. विमानांचे उड्डाण आणि या पक्ष्यांचा विहार यामधील अंतराचा वस्तुनिष्ठ अभ्यास व्हायला हवा. हे पक्षी विमानांच्या उड्डाणामध्ये अडथळा आणथील असा बागुलबुवा उभा करत पक्ष्यांच्या अधिवासावर अतिक्रमण करणे योग्य नाही, असे वनविभागाचे स्पष्ट मत आहे.
>
> गणेश नाईक, वनमंत्री

### वादाचा केंद्रबिंदू नेमका काय ?

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या परिसरातील डीपीएस आणि एनआरआय तलावांसह काही पाणथळ क्षेत्रांमध्ये दरवर्षी हजारो फ्लेमिंगो आणि इतर स्थलांतरित पक्षी येतात. विमानतळ सुरू झाल्यानंतर या पक्ष्यांमुळे 'बर्ड स्ट्राईक'चा धोका निर्माण होऊ शकतो, असा दावा पुढे करण्यात येत आहे. पर्यावरणप्रेमींच्या मते ही क्षेत्रे क्षेत्रे शहराच्या जैवविविधतेसाठी अत्यंत महत्त्वाची असून त्यांना संवर्धनाचा दर्जा मिळणे आवश्यक आहे.

# आजाराला कंटाळून ३५ वर्षीय महिलेची आत्महत्या

ठाणे (सम्यक कासारे) : मूत्रपिंड आजाराच्या वेदना आणि वैयक्तिक आयुष्यातील संकटांमुळे त्रस्त झालेल्या ३५ वर्षीय महिलेने ठाण्यातील रेवाळे तलावात उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना शुक्रवारी उघडकीस आली. अग्निशमन दलाच्या मदतीने मृतदेह बाहेर काढण्यात आला असून कापूरबावडी पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत.

सोनी गायकवाड (वय ३५) असे मृत महिलेचे नाव आहे. त्या मुंबईतील कांदिवली परिसरात राहत होत्या. गेल्या काही काळापासून त्या मूत्रपिंडाच्या आजाराने त्रस्त होत्या. याशिवाय सुमारे वर्षभरापूर्वी त्यांच्या पतीचे निधन झाले होते. पतीच्या निधनाचा मानसिक आघात आणि त्यातच सुरू असलेल्या आजाराच्या वेदनांमुळे त्या मानसिक तणावाखाली होत्या.

गुरुवारी त्या आपल्या मुलासह ठाण्यातील बाळकुम परिसरातील यशस्वी नगर येथे राहणाऱ्या बहिणीच्या घरी आल्या होत्या. त्यावेळी त्या वारंवार “मला आता जगायचे नाही, या वेदना सहन होत नाहीत, ” असे बोलत असल्याचे नातेवाईकांनी पोलिसांना सांगितले. रात्रीच्या सुमारास त्या घराबाहेर पडल्या. त्यानंतर त्यांनी यशस्वी नगर परिसरातील रेवाळे तलावात उडी घेत आत्महत्या केल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

ही घटना शुक्रवारी सकाळी उघडकीस आली. या घटनेची माहिती मिळताच, कापूरबावडी पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि कर्मचारी, तसेच ठाणे महापालिकेचे अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी बचाव साहित्याच्या सहाय्याने तलावातून मृतदेह बाहेर काढला. त्यानंतर मृतदेह पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवला आहे.

# नवीन वाहनतळात वाहनांऐवजी कचऱ्याचे ढीग, अंबरनाथ नगर परिषदेच्या मुख्यालयातील प्रकार

अंबरनाथ (विशाल कारंडे) : शहराच्या स्वच्छतेचा आणि आरोग्याचा संदेश देणाऱ्या अंबरनाथ नगर परिषदेच्या नवीन भव्य प्रशासकीय इमारतीच्या तळमजल्यातच कचऱ्याचे साम्राज्य पसरले आहे. प्रशासनाने कोट्यवधी रुपये खर्चून तयार केलेल्या हक्काच्या वाहनतळाचा वापर वाहने उभी करण्याऐवजी विविध प्रकारचे कुजलेले हजारो झेंडे, बॅनर आणि फेरीवाल्यांच्या भंगार गाड्या टाकण्यासाठी केला जात आहे. त्यामुळे पालिकेच्या तळमजल्यालाच कचराभूमीचे स्वरूप आले असून, आधीच शहरातील स्वच्छतेचा बोजवारा उडाला असताना आता स्वत:च्याच इमारतीमधील अस्वच्छतेबाबत पालिकेचा आरोग्य विभाग आणि लोकप्रतिनिधी पूर्णपणे उदासीन असल्याचे समोर आले आहे.



भविष्यातील महापालिकेचा विस्तार लक्षात घेऊन अंबरनाथ नगरपालिकेने तब्बल ७० कोटी रुपये खर्च करून चार मजली भव्य प्रशासकीय इमारत उभारली आहे. तर उर्वरित दोन मजल्यांचे बांधकाम अजूनही प्रगतीपथावर आहे. या इमारतीमध्ये येणाऱ्या अधिकारी, कर्मचारी आणि लोकप्रतिनिधींच्या वाहनांसाठी तळमजल्यात एक प्रशस्त व भव्य वाहनतळ तयार करण्यात आले होते. मात्र, दुर्दैवाने गेल्या दोन वर्षांत या वाहनतळाचा मूळ उद्देशासाठी वापरच झालेला नाही.

पालिका अधिकारी आणि लोकप्रतिनिधी आपली वाहने पार्किंगमध्ये लावण्याऐवजी पालिकेच्या मुख्य आवारातच बेशिस्तपणे उभी करत आहेत. परिणामी, हे हक्काचे पार्किंग रिकामे राहिल्याने पालिकेच्या बाजार, मिळकत आणि अतिक्रमण विभागाने या जागेचा वापर जप्त केलेले टाकाऊ साहित्य टाकण्यासाठी सुरू केला आहे.

सध्या या वाहनतळाच्या आवारात निवडणुकांच्या काळात जप्त केलेल्या आणि आता पूर्णपणे कुजलेल्या हजारो झेंड्यांचे ढीग साचले आहेत. त्यासोबतच शेकडो जुने बॅनर आणि अतिक्रमण विभागाच्या कारवाईत जप्त केलेल्या फेरीवाल्यांच्या तोडक्या-मोडक्या गाड्या तिथेच सडत पडल्या आहेत. यामुळे या संपूर्ण परिसरात प्रचंड अस्वच्छता पसरली असून तिथे दुर्गंधीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. या अस्वच्छतेत आणखी एक धक्कादायक बाब म्हणजे, जनगणनेच्या जनजागृतीसाठी पालिकेने लाखो रुपयांचा निधी खर्च करून तयार केलेले शेकडो बॅनर्स शहरात लावण्याऐवजी थेट या कचऱ्याच्या ढिगाऱ्यात आणून टाकण्यात आले आहेत .ज्या इमारतीमधून संपूर्ण शहराचा कारभार चालतो, तिथेच मुख्य प्रवेशद्वाराच्या खाली हे सर्व सुरू असताना मुख्याधिकारी, नगराध्यक्ष, आरोग्य विभाग किंवा एकाही लोकप्रतिनिधीचे याकडे लक्ष गेलेले नाही. पालिकेचा परिसर दररोज साफ करणाऱ्या स्वच्छता कर्मचाऱ्यांनाही हा कचरा दिसत नसल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

# डोंबिवलीतील महिलेचा सायकलवरून मनाली ते खरदुँग ला ४२५ किमीचा खडतर प्रवास

डोंबिवली (प्रथमेश चव्हाण) : डोंबिवलीतील रहिवासी हर्षल ललित सरोदे यांनी २४ मे ते ३ जून २०२६ या कालावधीत मनाली, लेह ते खरदुँगला हा खडतर प्रवास सायकलवरून पूर्ण केला. चक्री वारे, रस्त्याचे उभे चढ, काही ठिकाणी बोचरी थंडी अशा वातावरणातून हर्षल यांनी ही सायकल मोहीम पूर्ण केली.




या सायकल प्रवासात हर्षल सरोदे यांनी रोहतांग १३ हजार ५० फूट, बरलाच्छाला १६ हजार ४० फूट, नक्कीला १५ हजार ५४७ फूट, लाचुलुग्नाला १६ हजार ६१६ फूट, तंगलांग १७ हजार ५८२ फूट डोंगर दऱ्यातील उंच चढावाचे भूप्रदेश सायकलने पार केले. सायकल प्रवासातील एक वेगळा आव्हानात्मक अनुभव या सायकल मोहिमेत मिळाला, असे हर्षल सांगतात.

मागील दोन वर्षात हर्षल यांनी सलग दोन वेळा पंढरपूर ते घुमान (पंजाब) हे २ हजार ६७८ किमीचे अंतर २४ दिवसात पूर्ण केले होते. महाराष्ट्रातील १०० हून अधिक सायकलपटू या मोहिमेत सहभागी झाले होते. या २४ दिवसांच्या सायकल प्रवासात आपण कधीही आपली सायकल टेम्पोमध्ये टाकून प्रवास केला नाही. प्रारंभापासून ते शेवटापर्यंत आपण सायकलाचा पायडल मारणे थांबवले नाही. कल्याण, डोंबिवलीतील महिलाही या उपक्रमात सहभागी होतात.

एव्हरग्रीन सायकल ग्रुपने महिला, पुरूष, मुले यांचा गट असलेली डोंबिवली ते पंढरपूर सायकल मोहीम मागील वर्षी ४ दिवसात पूर्ण केली होती. या उपक्रमासाठी भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, भाजप कल्याण जिल्हाध्यक्ष नंदू परब यांनी मोलाचे सहकार्य केले होते. अखिल महाराष्ट्र पर्यावरणपूरक सायकल मोहिमेत हर्षल सहभागी झाल्या होत्या. ५० दिवसांच्या १ हजार किमी लांबीच्या या स्पर्धेत अग्रस्थानी राहून हर्षल सरोदे यांनी कल्याण डोंबिवलीचे नाव या मोहिमेत झळकवले होते. त्यांनी एकटीने चार वेळा पंढरपूर वारी सायकलने स्वारीने पूर्ण केली आहे.

सामाजिक बांधिलकीचा विचार करून हर्षल या पर्यावरण संवर्धन, मुलीला शिकवा, मुलीला वाढवा, प्लास्टिक निर्मूलन, झाडे लावा झाडे वाचवा, सायकल चालवा इंधन वाचवा, असा संदेश देणाऱ्या अनेक सायकल मोहिमांमध्ये सहभागी झाल्या आहेत.

सायकल स्पर्धेतील या यशस्वी सहभाग आणि यशाबद्दल नारी शक्ती सन्मान, लोक गौरव राष्ट्रीय एकात्मतता परिषदेचा पुरस्कार, स्फूर्ती महिला सामाजिक संस्था, आम्ही सायकल प्रेमी संस्थेचा सन्मान अशा अनेक पुरस्कार, सन्मानांनी हर्षल सरोदे यांना सन्मानित करण्यात आले आहे. लेह ते खरदुंगला सायकल मोहीम यशस्वी केल्याबद्दल सायकलपटू हर्षल सरोदे यांचा डोंबिवलीत पद्मश्री गजानन माने, भाजप नगरसेविका रंजना पेणकर, फ प्रभागाचे साहाय्यक आयुक्त प्रसाद ठाकुर, विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता जितेंद्र शिंदे यांच्या उपस्थितीत सन्मान करण्यात आला.

# पैसे उकळणारी तोतया महिला जेरबंद

भिवंडी (प्रतिनिधी) : अन्न व औषध प्रशासन विभागाची अधिकारी असल्याचे भासवून शहरातील हॉटेल व्यावसायिक आणि घाऊक विक्रेत्यांना धमकावत पैसे उकळणाऱ्या एका तोतया महिला अधिकाऱ्याला पोलिसांनी अटक केली आहे. शांताबाई दशरथ राजपूत असे अटक करण्यात आलेल्या महिलेचे नाव असून न्यायालयाने तिला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या टोळीतील अन्य दोन महिला आणि एक पुरुष आरोपी घटनास्थळावरून फरार झाले असून त्यांचा शोध सुरू आहे.




शांतीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सागर प्लाझा हॉटेल परिसरातील एका घाऊक दुकानात आरोपी महिला तिच्या साथीदारांसह आली होती. त्यांनी स्वत:ला अन्न व औषध प्रशासन विभागाचे अधिकारी असल्याचे सांगत दुकानदारांवर शिळे अन्नपदार्थ व मुदतबाह्य साहित्य विक्री केल्याचा आरोप केला .त्यानंतर कारवाईची भीती दाखवून दुकानदारांकडे पैशांची मागणी करण्यात आली. मात्र, नागरिकांच्या सतर्कतेमुळे हा प्रकार उघडकीस आला. माहिती मिळताच शांतीनगर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत आरोपी महिलेला ताब्यात घेतले.

पीडित दुकानदारांच्या तक्रारीवरून पोलिसांनी संबंधित टोळीविरुद्ध खंडणी उकळणे, तोतया अधिकारी बनून फसवणूक करणे आदी कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, फरार झालेल्या अन्य तीन आरोपींचा शोध सुरू असून या टोळीने यापूर्वी अशाच प्रकारचे गुन्हे केले आहेत का, याचाही तपास पोलीस करत आहेत.

# धोरण निर्मितीसाठी सांख्यिकी माहितीचा पाया मजबूत

## कोकण व पुणे विभागीय सांख्यिकी प्रशिक्षण कार्यशाळा तळेगाव येथे संपन्न

नवी मुंबई (धनश्री सट्टा) : महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागांतर्गत असलेल्या अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयाद्वारे राज्यामध्ये प्रथमच आयोजित करण्यात येत असलेल्या नियतकालिक श्रमशक्ती सर्वेक्षण (PLFS) आणि असंघटित क्षेत्रातील उद्यमांचे वार्षिक सर्वेक्षण (ASUSE) या अत्यंत महत्त्वपूर्ण मोहिमेचा पाया घालणारी विभागीय प्रशिक्षण कार्यशाळा राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था (NIPHT), तळेगाव दाभाडे येथे नुकतीच यशस्वीरीत्या संपन्न झाली आहे. कोकण व पुणे विभागातील क्षेत्रीय कामासाठी नियुक्त केलेल्या अन्वेषक व पर्यवेक्षकांसाठी दि. ०५ जून २०२६ ते १० जून २०२६ या कालावधीत ही पाच दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती, ज्याचे उद्घाटन अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, मुंबईच्या आयुक्त डॉ. ज्योत्स्ना पडियार (भा.प्र.से.) यांच्या हस्ते झाले. एप्रिल २०२६ ते मार्च २०२७ या कालावधीत चालणाऱ्या या संपूर्ण सर्वेक्षणांतर्गत संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये एकूण ६ हजार ८२८ नमुना घटकांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, हे काम २७६ अन्वेषक व निरीक्षकांमार्फत पूर्ण केले जाणार आहे. यामध्ये प्रामुख्याने कोकण व पुणे विभागाचा विचार करता, शहरी आणि ग्रामीण भाग मिळून एकूण २ हजार ९५६ नमुना घटकांचे सर्वेक्षण निश्चित करण्यात आले असून, हे उद्दिष्ट ७५ अन्वेषक आणि २८ पर्यवेक्षकांच्या पथकाद्वारे पूर्ण केले जाईल. या महत्त्वपूर्ण उद्घाटन प्रसंगी मुख्य कार्य कारी अधिकारी तथा प्रभारी जिल्हाधिकारी गजानन पाटील यांनी ऑनलाइन व्हिडिओ प्रणालीद्वारे उपस्थित राहून आपले मार्गदर्शनपर विचार मांडले. त्यांनी स्पष्ट केले की, या दोन्ही सर्वेक्षणांतून गोळा होणारी आकडेवारी ही ग्रामपातळी, जिल्हा आणि थेट विभागस्तरावरील विविध कल्याणकारी योजना व अचूक धोरण निर्मितीसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे, त्यामुळे नागरिकांनी प्रगणकांना अचूक माहिती देऊन सहकार्य करावे. 'विकसित भारत @ २०४७' चे ध्येय साध्य करण्यासाठी आणि पुराव्यांवर आधारित डेटाचा (एव्हिडन्स बेस्ड डेटा) उपयोग करून शासनाला धोरणात्मक निर्णय घेणे सोपे जावे, या दृष्टीने हा प्रशिक्षण कार्यक्रम म्हणजे सर्वेक्षणाच्या यशस्वी अंमलबजावणीची एक भक्कम पायाभरणी असल्याचे प्रतिपादन राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय (NSO FOD) पुणे येथील सहसंचालक डॉ. रुही कुलकर्णी यांनी केले.सेवानिवृत्त अतिरिक्त महासंचालक अशोक टोपराणी यांनी देशाच्या एकूणच आर्थिक प्रगतीचे मोजमाप करण्यामध्ये या दोन्ही सांख्यिकी सर्वेक्षणांचे अनन्यसाधारण महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाच्या मुख्य अतिथी व आयुक्त डॉ. ज्योत्स्ना पडियार यांनी अधिक सविस्तर माहिती देताना सांगितले की, 'विकसित भारत @ २०४७' नुसार आता जिल्हा हे विकासाचे मुख्य केंद्र बनले आहे. त्यामुळे जिल्हास्तरीय रोजगार-बेरोजगार आकडेवारी, असंघटित क्षेत्रातील उद्योगांची अचूक संख्या आणि रोजगार निर्मिती यांसारख्या निर्देशकांची सांख्यिकीय माहिती याद्वारे उपलब्ध होईल, जी राज्य व जिल्ह्याचा उत्पन्नाचा अंदाज तयार करण्यास आणि शासनाच्या विविध योजना आखण्यास उपयुक्त ठरेल. या पाच दिवसीय निवासी प्रशिक्षणादरम्यान 'Ipsos Research Pvt. Ltd. Mumbai' या बाह्यसंस्थेकडून नियुक्त करण्यात आलेल्या प्रगणक व पर्यवेक्षकांना रोजगाराची रचना, कामगार सहभाग दर, तसेच असंघटित क्षेत्रातील उद्योगांचे स्वरूप, आर्थिक स्थिती, उत्पन्न व खर्च यांसारख्या तांत्रिक संकल्पनांचे सखोल ज्ञान देण्यात आले, तसेच 'CAPI' तंत्रज्ञानाचा वापर करून 'Tablet' वर थेट माहितीची अचूक नोंदणी कशी करावी याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक व प्रशिक्षण देण्यात आले.या प्रशिक्षण सोहळ्याच्या व्यासपीठावर मुख्य कार्यालयाचे सहआयुक्त भीष्म बिरादार, विभागीय आयुक्त कार्यालय पुणेचे सहआयुक्त (नियोजन) संजय मरकळे, जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर, जिल्हा सांख्यिकी कार्यालयाच्या उपआयुक्त प्रियांका बोकील आणि इप्सॉस (Ipsos) संस्थेच्या संचालक तृप्ती शर्मा प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, कोकण विभागाचे सहआयुक्त जयसिंग मेहेत्रे यांनी केलेल्या प्रास्ताविकाने झाली, तर संपूर्ण कार्यशाळेचे आभार प्रदर्शन प्रादेशिक कार्यालय पुणे येथील प्रभारी सहआयुक्त वृषाली माकर यांनी केले.

# चला, पाल्यांना मराठी शाळेत घालूया !
# जि.प.च्या शाळांना प्रवेशासाठी निवडूया

जून महिना उजाडला की नव्या शैक्षणिक वर्षाची चाहूल लागते. घराघरांत मुलांच्या शाळा प्रवेशाची लगबग सुरू होते. आपल्या पाल्याला कोणत्या शाळेत प्रवेश द्यावा, हा प्रत्येक पालकासमोरील महत्त्वाचा प्रश्न असतो. अशा वेळी एक मराठी माणूस, एक जबाबदार पालक आणि आपल्या मातृभाषेचा अभिमान बाळगणारा नागरिक म्हणून आपण स्वत:ला एक प्रश्न विचारला पाहिजे – "आपल्या मुलाला जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेत प्रवेश का देऊ नये?"

आज आपल्या राज्यातील जिल्हा परिषदांच्या प्राथमिक, माध्यमिक शाळा गुणवत्तापूर्ण शिक्षण, उत्तम शिक्षक, आधुनिक सुविधा आणि संस्कारक्षम वातावरण यामुळे नव्या उंचीवर पोहोचत आहेत. याला आणखी उंचीवर पोहोचविण्यासाठी आवश्यक आहे तो पालकांचा विश्वास ! आणि पालक म्हणून आपला सक्रिय सहभाग ! केवळ अफवा आणि यंत्रणेसंदर्भातील नकारात्मक दृष्टिकोन यामुळे ग्रामीण भागातील कमी खर्चाची, योग्य गुणवत्तेची आणि संस्कार करणारी एक यंत्रणा आम्ही कमकुवत तर करत नाही ना ? हा प्रश्न एकदा स्वत:ला विचारणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रात आतापर्यंत इतिहास घडवला तो जिल्हा परिषदेच्या शाळांनी. या शाळांमधून आजचे उच्चपदस्थ अधिकारी, शास्त्रज्ञ,डॉक्टर, वकील,कवी, लेखक,कृषी तज्ञ,समाज सुधारक तयार झाले आहेत. विशेषत: मराठी माध्यमातू शिकूनही ते कुठेही गुणवत्तेत मागे पडलेले नाही. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उदाहरण आमच्या अनेक पिढ्यांनी अनुभवले आहे .अपार कष्ट ,अवहेलना सहन करून अशा शाळांमधून शिक्षण घेत त्यांनी आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. देशातील मोठमोठ्या संस्थांवरचे गुणवान जिल्हा परिषदेच्या शाळांमधूनच तयार झाले आहे. त्यामुळे आपल्या पाल्यांना मराठी माध्यमाच्या आणि विशेषत: जिल्हा परिषद शाळांच्या दारी नेण्याची हीच योग्य वेळ आहे.

### जिल्हा परिषद शाळा : गुणवत्तेची खात्री

जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांची निवड अत्यंत पारदर्शक आणि गुणवत्तेच्या निकषांवर आधारित असते. शिक्षक पात्रता परीक्षा (TET), विविध स्पर्धात्मक प्रक्रिया, शैक्षणिक गुणवत्ता आणि शासनाने ठरवून दिलेल्या नियमांच्या आधारे शिक्षकांची नियुक्ती केली जाते. त्यामुळे समाजातील गुणवंत, प्रशिक्षित युवकच शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांसमोर उभे राहतात. जिल्हा परिषदेतील शिक्षकांच्या गुणवत्तेची वेळोवेळी तपासणी होते. प्रशिक्षण दिले जाते. त्यामुळे या शाळांमध्ये अप्रशिक्षित शिक्षक हा प्रश्न निकाली निघाला आहे.

शिक्षक हे राष्ट्रनिर्माते असतात. आपल्या गुरु शिष्य प्राचीन परंपरेला याच शाळा पुढे घेऊन गेल्या आहेत. येथील शिक्षक केवळ अभ्यासक्रम शिकवत नाहीत, तर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी, संस्कारांसाठी, देशाच्या आधुनिक शैक्षणिक धोरणांशी जोडले गेले असतात. त्यामुळे शासकीय शैक्षणिक संस्था अर्थात आपल्या शाळा जबाबदार नागरिक घडविणारी यंत्रणा म्हणून पुढे आल्या आहेत.


### मातृभाषेतून शिक्षण : अधिक आत्मविश्वास देणारे

शैक्षणिक संशोधन सातत्याने सांगते की, मुलांचे प्राथमिक शिक्षण मातृभाषेत झाले तर त्यांची आकलनशक्ती, विचारशक्ती आणि सर्जनशीलता अधिक चांगल्या प्रकारे विकसित होते. मराठी माध्यमातून शिकणारी मुले केवळ भाषा शिकत नाहीत, तर आपल्या संस्कृतीशी, इतिहासाशी, परंपरांशी, वारशाशी आणि सामाजिक मूल्यांशी जोडली जातात.

मराठी भाषेतील शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो. ते आपले विचार स्पष्टपणे व्यक्त करू शकतात. इंग्रजी व अन्य भाषा शिकणे आवश्यक आहेच; परंतु शिक्षणाचा पाया मातृभाषेत असणे अधिक परिणामकारक असल्याचे अनेक जागतिक तज्ज्ञांनी नमूद केले आहे.

### सर्वात मोठे बलस्थान : समर्पित शिक्षक

जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांना शासनाकडून नियमित व पूर्ण वेतन दिले जाते. त्यामुळे त्यांचे संपूर्ण लक्ष अध्यापन, विद्यार्थ्यांचा विकास आणि शाळेच्या प्रगतीकडे केंद्रित राहते. काही समर्पित शिक्षक स्वत:च्या खर्चातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देतात, विविध उपक्रम




राबवितात आणि गावोगावी शिक्षणाची ज्योत तेवत ठेवतात. साने गुरुजींच्या महाराष्ट्रात आजही अनेक ठिकाणी शिक्षकांच्या नावाने ती शाळा ओळखल्या जातात.

आज अनेक जिल्हा परिषद शाळांनी डिजिटल वर्गखोल्या, संगणक शिक्षण, विज्ञान प्रयोगशाळा, ई-लर्निंग सुविधा, क्रीडा साहित्य आणि विविध नवोपक्रमांच्या माध्यमातून उल्लेखनीय प्रगती साधली आहे. सेमी इंग्लिश शिक्षण पद्धती शाळांनी अवलंब केली आहे .शालेय व्यवस्थापन समिती आणि माझी विद्यार्थी मंडळाकडून अनेक सुधारणा होत आहे.

### राज्याचे शैक्षणिक धोरण ;मातृभाषेचे महत्त्व

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० तसेच महाराष्ट्र शासनाचे शैक्षणिक धोरण प्राथमिक स्तरावर मातृभाषेत शिक्षण देण्याला विशेष महत्त्व देते. मुलांचा बौद्धिक विकास, भाषिक कौशल्ये आणि संकल्पना समजून घेण्याची क्षमता वाढविण्यासाठी मातृभाषा हे सर्वात प्रभावी माध्यम असल्याचे या धोरणांमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे .याच विचारातून महाराष्ट्रातील मराठी शाळांना अधिक सक्षम, आधुनिक आणि गुणवत्तापूर्ण बनविण्याचे प्रयत्न सातत्याने सुरू आहेत. विशेष म्हणजे कला, क्रीडा, स्पर्धा परीक्षा या संदर्भातील मुलांच्या विकासाची यंत्रणा, श्रृंखला याच शाळांमध्ये पूर्ण होते. इथे निधी अभावी कधीही विद्यार्थ्याच्या खिशातून पैसा काढून स्पर्धा घेतली जात नाही, रद्द होत नाही,पुढे ढकलली जात नाही. क्रीडा स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, विज्ञान प्रदर्शनी, शिक्षकांचे प्रशिक्षण एकदा ठरले की पूर्ण केले जाते. राज्याच्या बाल कल्याण धोरणाला, बौद्धिक धोरणाला याच व्यासपीठावर राबविले जाते. त्यामुळे या यंत्रणेतून आपण बाद तर होत नाही ना ? याचा विचार व्हावा.

### आता प्रवेशासाठी लागतात रांगा

एक काळ असा होता की काही पालकांना जिल्हा परिषद शाळा म्हणजे ग्रामीण भागातील भक्कम पर्याय वाटत असे. मात्र, अफवा, गैरसमज,आणि काही अपवादात्मक घटनांनी या शाळा मधल्या काळात ओस पडायला लागल्या होत्या. मात्र आज परिस्थिती बदलली आहे. राज्यातील अनेक जिल्हा परिषद शाळांनी आपल्या गुणवत्तेमुळे वेगळी ओळख निर्माण केली आहे .सातारा, कोल्हापूर, पुणे, सिंधुदुर्ग, नाशिक, नागपूर, जळगाव आणि इतर अनेक जिल्ह्यांतील काही जिल्हा परिषद शाळांमध्ये प्रवेशासाठी पालकांची मोठी मागणी दिसून येते .अनेक शिक्षकांनी आपल्या दायित्वातून,गुणवत्तेतून ,कल्पकतेतून शाळांना नवी ओळख दिली आहे. डिजिटल शिक्षण, शैक्षणिक गुणवत्ता, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, संस्कारक्षम वातावरण आणि विद्यार्थ्यांचे उत्कृष्ट निकाल यामुळे या शाळांवर पालकांचा विश्वास वाढत आहे.

### नवे शैक्षणिक धोरण ;शाळांनी कात टाकली

काही ठिकाणी अपवादात्मक शाळांच्या जीर्ण इमारती व आवश्यक सोयीसुविधांची कमतरता दिसते. त्यामुळे पालकांनी केवळ भौतिक सुविधा बघून शाळांबाबत भूमिका बनविणे अयोग्य आहे .गरिबातील गरीब विद्यार्थ्यापासून सर्वांना शिक्षण मिळावे, अशी समतोल भूमिका शासनाची आहे .त्यामुळे अतिशय माफक शुल्कामध्ये या शाळेतील शिक्षण मुलांना घेता येते. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अनेक ॲप शाळांनी विकसित केले आहे .शिक्षकांना जबाबदारीने आपले कर्तव्य पार पाडावे लागत आहे .निपुण शाळा या मोहिमेतून शाळातील शिक्षणावर नियंत्रण ठेवले जात आहे. तिसऱ्या वर्गापासून प्रज्ञाशोध परीक्षा, चौथी व सातवीत होणारी स्कॉलरशिप परीक्षा, टॅलेंट सर्च परीक्षा,शालेय गणवेष, शालेय पोषण आहार, सगळ्यांना मोफत पुस्तके, केळी व अंडी वाटप, मुलींसाठी दैनिक भत्ता, मुलींना स्वतंत्र स्वच्छता गृह, सॅनेटरी नॅपकीनची उपलब्धता ,प्रवेश उत्सव, संस्कार शिबीर,अशा विविध उपक्रमांना शाळेत राबविण्यात येते. पहिलीपासून इंग्रजी अनिवार्य केले आहे. त्यामुळे इंग्रजी पासून कोणी वंचित राहत नाही. प्रत्येक जिल्ह्यातील काही शाळा सेमी इंग्लिश झाल्या आहेत. याशिवाय या सर्व यंत्रणेवर पालकांच्या पाच समित्यांचे नियंत्रण असते .त्यामुळे बाह्य चकाकी व इंग्रजी माध्यमांच्या आग्रहातून मुले दर्जेदार प्रशिक्षित शिक्षकांपासून, शिक्षणापासून वंचित राहू नये यावर विचार करण्याची ही गरज आहे.

### अनेक गावांनी शाळांसाठी घेतला पुढाकार

मराठी शाळा वाचविणे म्हणजे आपली ओळख जपणे होय .घरापासून योग्य अंतरावर असणारी शाळा मुलांना त्यांच्या बाल्यावस्थेत खेळ व अन्य कला गुणांसाठी भरपूर वेळ वाचवू शकते. गावातील शाळा बाजूला ठेवून शहरातील, तालुक्याच्या ठिकाणच्या शाळांसाठी पालकांना मोठ्या प्रमाणात अतिरिक्त खर्चही करावा लागतो. वाहन व्यवस्था करावी लागते. यामध्ये मुलांच्या जडणघडणीचा वेळ जातो. अनेक गावांनी ग्रामपंचायतीमार्फत ज्या पालकांनी जिल्हा परिषदेच्या शाळेत प्रवेश घेतला त्यांना घरपट्टीतही सवलत दिली आहे .अनेक गावांनी शिक्षकांना मुख्यालयी राहणे अनिवार्य केले आहे. गावाचे, गावातील प्रमुखांचे ,शाळांकडे लक्ष असणे आणि शिक्षकांचे गावातच राहणे यामुळे आदर्श जीवनपद्धतीची जपणूक ही होते. गावाप्रतीचा आदरही वृद्धिंगत होतो. शाळा म्हणजे केवळ शिक्षण देणारी संस्था नसते; ती संस्कृती, परंपरा, मूल्ये आणि समाजाची ओळख जपणारे केंद्र असते. गरीबी, श्रीमंती सोबत मिळणारे एकत्रित शिक्षण सामाजिक जाणिवा वृद्धींगत करते. त्यामुळे मराठी शाळा टिकल्या तर मराठी भाषा टिकेल. मराठी भाषा टिकली तर महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख अधिक बळकट राहील.

त्यामुळे आज आपल्या मुलाला मराठी शाळेत प्रवेश देणे म्हणजे केवळ एका शाळेची निवड नव्हे; तर आपल्या भाषेवर, संस्कृतीवर आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण व्यवस्थेवर व्यक्त केलेला विश्वास आहे. पालक, शिक्षक, अंगणवाडी सेविका, ग्रामसेवक, तलाठी, नगरसेवक, सरपंच, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षण तज्ज्ञ या सर्वांनीच ही बाब अधोरेखित करावी. अनियंत्रित खासगी यंत्रणेचे फटके समाज व्यवस्थेला बसत असताना, शिक्षणाची ही मूळ साखळी पुढे नेण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन शाळांना, शाळेच्या यंत्रणेला बळकट करणे आवश्यक आहे.

### चला, एक सकारात्मक निर्णय घेऊ या!

यंदाच्या शैक्षणिक वर्षात आपल्या गावातील, परिसरातील जिल्हा परिषद शाळेला भेट द्या. तेथील शिक्षकांशी संवाद साधा. शाळेच्या सुविधा पाहा. विद्यार्थ्यांचे यश जाणून घ्या. आणि मग आपल्या पाल्याच्या भविष्यासाठी विचारपूर्वक निर्णय घ्या. आमचे आई-वडील, आम्ही आणि आमची मुले जिल्हा परिषदेच्या शाळेतच शिकलेलो आहे. त्यामुळे यावर्षी निर्धारपूर्वक ठरवूया, आपल्या पुढच्या पिढीतील पाल्यांना मराठी शाळेत घालू या

मराठी भाषा, मराठी संस्कृती आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण यांचा अभिमानाने वारसा पुढील पिढीकडे सुपूर्द करू या!

प्रवीण टाके
उपसंचालक, (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय,कोल्हापूर

## पावसाळ्यातही मिळवा ऑईल-फ्री, तजेलदार आणि फ्रेश लूक

पावसाळा सुरू झाला की वातावरणात गारवा वाढतो, पण त्याचबरोबर हवेतली आर्द्रताही वाढते. अनेक महिलांना या काळात त्वचा अचानक तेलकट होणे, चेहऱ्यावर मुरूम येणे, त्वचा निस्तेज दिसणे किंवा मेकअप जास्त वेळ टिकत नसल्याची समस्या जाणवते. विशेषत: ऑफिस, कॉलेज किंवा बाहेरच्या कामांसाठी रोज प्रवास करणाऱ्यांना त्वचेची अतिरिक्त काळजी घ्यावी लागते.

त्वचा निरोगी आणि तजेलदार ठेवण्यासाठी महागड्या उपचारांची गरज नसते. काही साध्या सवयी आणि योग्य स्किनकेअर रूटीन फॉलो केल्यास पावसाळ्यातही फ्रेश लूक ठेवता येतो.

### १) त्वचेची स्वछता

दिवसभरातील धूळ, घाम आणि अतिरिक्त तेल त्वचेच्या छिद्रांमध्ये साचू शकते. त्यामुळे सकाळी आणि रात्री सौम्य फेसवॉशने चेहरा स्वच्छ करणे आवश्यक आहे. यामुळे त्वचेवरील अतिरिक्त तेल नियंत्रणात राहण्यास मदत होते.

### २) मॉइश्चरायझर

अनेकांना वाटते की तेलकट त्वचेला मॉइश्चरायझरची गरज नसते. प्रत्यक्षात त्वचा योग्य प्रमाणात हायड्रेट राहिली नाही तर ती आणखी तेल तयार करू लागते. हलक्या टेक्स्चरचे वॉटर-बेस्ड मॉइश्चरायझर वापरणे फायदेशीर ठरू शकते.

### ३) सनस्क्रीनचा वापर

पावसाळ्यात सूर्य दिसत नसला तरी अल्ट्राव्हायोलेट किरणे त्वचेवर परिणाम करू शकतात. त्यामुळे बाहेर पडताना योग्य SPF असलेले सनस्क्रीन लावणे विसरू नका. हे त्वचेचे टॅनिंग, डाग आणि अकाली वृद्धत्वापासून संरक्षण करते.

### ४) फेस मिस्ट

दिवसभर त्वचेला ताजेपणा देण्यासाठी फेस मिस्ट उपयुक्त ठरते. चेहरा धुतल्यानंतर किंवा बाहेरून आल्यावर फेस मिस्ट स्प्रे केल्याने त्वचा फ्रेश वाटते आणि चिपचिपेपणा कमी होण्यास मदत मिळते.



### ५) स्क्रबिंग

डेड स्किनमुळे त्वचा निस्तेज दिसू शकते. सौम्य स्क्रबच्या मदतीने मृत त्वचा दूर केल्यास चेहरा अधिक स्वच्छ आणि उजळ दिसतो. मात्र अतिप्रमाणात स्क्रबिंग टाळणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

### ६) घरगुती फेसपॅक

मुलतानी माती, बेसन, दही किंवा गुलाबपाणी यांसारख्या नैसर्गिक घटकांचा वापर करून तयार केलेले फेसपॅक अतिरिक्त तेल शोषून घेण्यास मदत करतात. त्यामुळे त्वचा स्वच्छ आणि तजेलदार दिसते.

### ७) व्हिटॅमिन सी

व्हिटॅमिन सीयुक्त सीरम किंवा फेस मास्क त्वचेला नैसर्गिक चमक देण्यास मदत करतात. पावसाळ्यात त्वचा निस्तेज दिसत असल्यास अशा उत्पादनांचा मर्यादित वापर फायदेशीर ठरू शकतो.

### ८) टोनचा वापर

चेहरा स्वच्छ केल्यानंतर टोनर वापरल्याने त्वचेवरील उरलेली घाण दूर होते आणि त्वचेला ताजेतवाने वाटते. संवेदनशील त्वचेसाठी सौम्य आणि अल्कोहोल-फ्री टोनर निवडणे योग्य ठरते.

### ९) पुरेसे पाणी

फक्त बाह्य काळजी पुरेशी नसते. शरीर हायड्रेट राहिल्यास त्वचेवर त्याचा सकारात्मक परिणाम दिसून येतो. त्यामुळे दिवसातून पुरेसे पाणी पिण्याची सवय लावा.

## हार्मोन्स बॅलेन्स ठेवण्यासाठी ब्रीदिंग एक्सरसाइज

हल्लीच्या धावपळीच्या जीवनशैलीत महिलांमध्ये हार्मोनल असंतुलनाची समस्या झपाट्याने वाढताना दिसत आहे. हार्मोन्सचे संतुलन बिघडल्यास प्रजनन क्षमता, झोप, मूड, वजन आणि एकूणच आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. योग्य आहार आणि नियमित व्यायामासोबत काही सोप्या ब्रीदिंग एक्सरसाइजचा समावेश केल्यास हार्मोन्स संतुलित ठेवण्यास मदत मिळू शकते.

### हार्मोनल बॅलेन्स का महत्त्वाचे?



शरीरातील हार्मोन्स विविध शारीरिक प्रक्रियांचे नियंत्रण करतात. तणाव, अपुरी झोप, चुकीचा आहार आणि निष्क्रिय जीवनशैली यामुळे हार्मोन्सचे संतुलन बिघडू शकते. याचा परिणाम थकवा, चिडचिड, मूड स्विंग्स आणि मासिक पाळीतील अनियमितता यांसारख्या समस्यांवर होऊ शकतो.

### ब्रीदिंग एक्सरसाइज

### १) बेली ब्रीदिंग

बेली ब्रीदिंग ही अतिशय सोपी आणि प्रभावी श्वसन पद्धत आहे. शांत ठिकाणी बसून किंवा झोपून एक हात छातीवर आणि दुसरा पोटावर ठेवावा. नाकाने हळूहळू श्वास घेताना पोट फुगू द्यावे आणि श्वास सोडताना पोट आत जाऊ द्यावे. ही प्रक्रिया 5 ते 10 मिनिटे केल्यास शरीरातील तणाव निर्माण करणारे कोर्टिसोल हार्मोन कमी होण्यास मदत होते. तसेच मन शांत राहते आणि झोपेची गुणवत्ता सुधारते.

### २) अनुलोम विलोम

अनुलोम विलोम हा योगातील लोकप्रिय प्राणायाम प्रकार आहे. पद्मासन किंवा सुखासनात बसून एका नाकपुडीतून श्वास घेऊन दुसऱ्या नाकपुडीतून सोडण्याची ही प्रक्रिया असते. नियमित अनुलोम विलोम केल्याने कोर्टिसोल आणि थायरॉइड हार्मोन्स संतुलित राहण्यास मदत होते. याशिवाय हृदय आणि फुफ्फुसांचे आरोग्य सुधारते तसेच मानसिक तणाव कमी होतो.

## पावसात मुंबईजवळ ट्रेकिंग आणि निसर्गाचा आनंद घेण्यासाठी बेस्ट ठिकाणे

पावसाळा सुरू होताच मुंबईकरांना भटकंतीचे वेध लागतात. मुंबई हे एकमेव ठिकाण आहे जेथे हिरवागार निसर्ग, धबधबे, धुक्याने वेढलेले डोंगर, समुद्रकिनारा, किल्ले, पठार अशा सर्व प्रकारच्या निसर्गाच्या छटा अनुभवण्यास मिळतात. विकेंडला कुटुंबीय किंवा मित्रांसोबत पावसाचा आनंद लुटायचा असेल तर मुंबईतील खास ठिकाणांविषयी जाणून घेऊयात.

### कोंडेश्वर धबधबा – बदलापूर



बदलापूर रेल्वे स्थानकापासून अवघ्या १५ कि.मी अंतरावर असलेला हा धबधबा या दिवसात निसर्गाचा अनुभव घेण्यासाठी उत्तम आहे. या नयनरम्य धबधब्याखाली भिजण्याची मज्जा लुटण्यासाठी स्थानिक तसेच मुंबई आणि मुंबईबाहेरून अनेक पर्यटक दरवर्षी येतात. याठिकाणी जाण्यासाठी स्वत;ची गाडी असले तर सोपं जातं.

### भिवपुरी धबधबा – भिवपुरी

भिवपुरी स्थानकाहून शेतातून जाणाऱ्या पायवाटेने अर्ध्या तासात भिवपुरी धबधब्याकडे जाता येते. माथेरानमधून वाहणारा हा धबधबा पाहण्यासाठी पर्यटक विकेंड्सला मोठी गर्दी करतात. याठिकाणी अनेक हॉटेल्स असून राहण्यासाठी उत्तम सोय आहे.

### कान्हेरी – बोरिवली

मुंबईसारख्या गजबजलेल्या शहरात पावसाळ्यातील एक निवांत पिकनिक स्पॉट म्हणजे बोरिवलीतील कान्हेरी गुंफा. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील कान्हेरी लेणी परिसरात दरवर्षी पावसाळ्यात अनेक धबधबे आणि नयनरम्य निसर्ग दृष्य पाहण्यासाठी पर्यटक येतात.

### जव्हार – पालघर

पालघरमधील जव्हार हे ठिकाण पावसाळ्यात फिरण्यासाठी आणखी एक उत्तम ठिकाण आहे. याठिकाणी राजवाडे, किल्ले यासह समुद्र किनारा पाहता येईल. आजही या ठिकाणी वारली संस्कृती पाहता येते.

# समाजसेवक दलितमित्र राजा जाधव यांचा जीवनप्रवास


## दादर ते दादर : पुस्तक परिचय

दादर ते दादर हे पुस्तक आहे एका सच्च्या समाजसेवकाची, निष्ठावंत संघटना कार्यकर्त्याची, सामाजिक निकषांप्रमाणे अत्यंत कमी शिक्षण झाले असूनही ठाणे- मुंबईतील एक प्रतिथयश बांधकाम व्यावसायिक तसेच विकासकाची प्रेरक गाथा...'ग्रंथाली प्रकाशन'तर्फे प्रकाशित झालेल्या या पुस्तकाचे 'चरित्र नायकाचा करारी चेहरा असलेले' मुखपृष्ठ आपल्याला खिळवून ठेवते.

'बिल्डर' म्हटले की आपल्या डोळ्यासमोर सर्वसाधारणपणे असलेल्या प्रतिमेला छेद देणाऱ्या, गोरगरीब, अपघातग्रस्त, आदिवासी विद्यार्थी यांना आपला व्यवसाय बाजूला ठेवून मदत (बहुतेक वेळा आर्थिक मदत) करणाऱ्या, आणि हे सर्व करीत असताना आपले विविध छंद जोपासणाऱ्या 'राजा जाधव' नामक अफाट व्यक्तिमत्वाचे शब्दरूप लेखक 'दादासाहेब दापोलीकर' या नावाने लेखन करणारे 'श्री. सुमंत जुवेकर' यांनी हे चरित्र लिहिले आहे.'दादर ते दादर' या पुस्तकाच्या नावात दोनदा तोच शब्द कसा काय ?' हा प्रश्न वाचकाच्या मनात येतोच येतो. अपरांत प्रदेशाची प्राचीन राजधानी शूर्पारक म्हणजेच आताचे नालासोपारा येथील 'दादर' (म्हणजे प्राचीन काळी नौका थांबण्याचे स्थान) ते राजाभाऊंचे सध्याचे निवासस्थान असलेले मुंबईतील 'दादर' उपनगर इथपर्यंतचा चरित्रनायकाचा जीवनप्रवास उलगडून दाखवणारे हे पुस्तक- म्हणजे 'दादर ते दादर ! 'दहावी नापास मुलगा ते यशस्वी बिल्डर' हा धाडसी प्रवास या पुस्तकात एकूण तेरा प्रकरणांमध्ये लेखकांने प्रवाही पद्धतीने लिहिला आहे.

'साष्टी ते सुरत आणि सुरत ते नालासोपारा, बालपण' या पहिल्या प्रकरणात राजाभाऊंच्या पूर्वजांचा संबंध प्रत्यक्ष शिवाजी महाराजांशी कसा आला होता, याची सुरस कहाणी वाचून आपण थक्क होतो. राजा यांचे भावंडांच्या सहवासातील, एकत्र कुटुंबातील ते दिवस म्हणजे भावुकतेने भरलेल्या रम्य आठवणी आहेत. खोडकरपणा, घरी आणि शाळेत करीत असलेले 'नसते उपद्याप' यासाठी संपूर्ण गावामध्ये प्रसिद्ध असलेल्या राजाने आईच्या, मोठ्या बहिणीच्या हातचा कैकदा मार खाल्ला. पण त्यांच्यातील प्रेम कधी कमी झाले नाही. कठीण परिस्थिती असली, तरीही घरातील मोठ्या माणसांनी सर्व मुलांवर शिक्षणाचा संस्कार आवर्जून केला होता. वारंवार प्रयत्न करूनही शाळा आणि अभ्यासाचे गणित न साधलेल्या राजाने नोकरीसाठी प्रयत्न करण्याचे ठरवले. सुरुवातीलाच हातमागावर काम करण्याची नोकरी मिळवली. नंतर काही वर्षे रिक्षा चालवली, कापड विकले, टोप्या विकल्या, दुकानही चालवले.चांगल्या मार्गांचा अवलंब करून पैसे कमवण्यासाठी राजाने कुठलीही लाज बाळगली नाही. या उद्योगीपणामध्येच पुढील आयुष्यात मिळणाऱ्या देदीप्यमान यशाची बीजे रोवली गेली होती.

त्यानंतर वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये नोकरी करण्याचा अनुभव घेणाऱ्या राजाने प्रेमाचे गणितदेखील सोडवले. 'सुरेखा' नावाची एक गोड मुलगी राजाच्या आयुष्यात नकळत आली. सुरेखालाही रुबाबदार, तिला धाडसी राजा पसंत होता. त्या दोघांनी एकमेकांना जीवनभर साथ देण्याचा निर्णय घेतला. जातीपातीच्या संकल्पनांमुळे या आंतरजातीय विवाहाला सुरुवातीला सुरेखाच्या घरच्यांचा विरोध होता. तरीही सुरेखाने राजाला खंबीरपणे साथ दिली. सहजीवनाचे मधुर क्षण अनुभवताना त्या दोघांनाही कधी कधी कठीण प्रसंगांना तोंड द्यावे लागत होते. संसाराची, कुटुंबाची जबाबदारी पेलण्यास समर्थ असलेला राजा मोठ्या खटपटी करत होता. कुणाचे उपकार घेणे त्याला ठाऊक नव्हते. आईवडील, भावंडे या साऱ्यांच्या पाठिंब्याने राजा - सुरेखाचे जीवन गोड वळण घेत होते. संसारवेलीवर फुले उमलली होती. घराला गोकुळाचे स्वरूप आले होते. कुटुंबाची जबाबदारी सांभाळणाऱ्या राजा कागदी पिशव्या बनविणे आणि असे छोटे छोटे व्यवसाय करत होताच. याच काळामध्ये बाळासाहेब ठाकरे यांच्या ज्वलंत




आणि मऱ्हाटमोळ्या नेतृत्वाचा उदय होत होता. त्यावेळच्या अनेक मराठी तरुणांप्रमाणे राजासुद्धा बाळासाहेबांकडे आणि पर्यायाने शिवसेनेकडे आकृष्ट झाला. मराठी माणसाच्या न्यायहक्कांसाठी शिवसेनेच्या आंदोलनांमध्ये राजा सहभागी होऊ लागला.आता 'राजा' ची ओळख 'राजाभाऊ' म्हणून होण्यास सुरुवात झाली होती. राजाभाऊंनी बंधू रमण, विजय, शरद यांच्यासहित बांधकाम व्यवसायात प्रवेश केला होता. 'रिक्षा, दुकानदारी ते थेट बिल्डर्स अँड डेव्हलपर्स' या प्रकरणात लेखकांनी बिल्डर व्यवसायातील बारकावे, खास तेथे वापरल्या जाणाऱ्या परिभाषा, त्यातील येणाऱ्या अडचणी, त्या अडचणींवर केलेली मात असा सर्व प्रवास अचूकतेने आणि प्रभावीपणे आणि महत्त्वाचे म्हणजे या क्षेत्राशी संबंधित नसलेल्या वाचकालाही समजेल अशा साध्या, सोप्या भाषेमध्ये मांडला आहे. बांधकाम व्यावसायिकांचे यश आणि पैसा सर्वांना दिसतो. परंतु त्यासाठी ते घेत असलेले कष्ट आणि धोके लोकांना माहीत नसतात. बांधकाम व्यवसायातील अनेक खाचाखोचा, संभाव्य धोके, जबाबदाऱ्या यांचे रंजक परंतु वास्तववादी वर्णन वाचायला मिळते.

'समाजसेवा' या प्रकरणात राजाभाऊंच्या आयुष्यात आलेल्या हृदयद्रावक, कठीण प्रसंगांचे वर्णन वाचताना आपणही हळवे होतो. कोणावर कशी वेळ येईल सांगता येत नाही. मात्र राजाभाऊंसारखा 'देवदूत' पीडितांच्या पाठीशी उभा असतो. कधी रेल्वे अपघात झाला, तेव्हा बेधडकपणे जखमी रुग्णांना रुग्णालयात पोहोचवणे, रुग्णवाहिकेची व्यवस्था करणे, गरीब, दलित, गरजू, होतकरू विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंचे वाटप करणे, त्यांना आर्थिक साहाय्य करणे, पालघर, जव्हार, मोखाडा, खोडाळा वगैरे शाळांना दिवाळीचा फराळ, औषधे, शिष्यवृत्ती वाटणे, तसेच रक्तदान शिबीरे उभारणे, समाजात घडणाऱ्या महत्वाच्या घटनांची दखल घेऊन त्याच्या चित्रफितींचे प्रदर्शन भरवणे, स्वातंत्र्यवीर सावरकर, भगवान गौतम बुद्ध अशा महापुरुषांच्या पुतळ्यांची उभारणी करणे, विविध आंदोलने, मोर्चे यांचे नेतृत्व करणे, मोठमोठ्या सभा आपल्या खणखणीत, बेधडक भाषणांनी गाजवणे अशी अनेक सामाजिक व्रते अंगिकारलेला हा बाळासाहेबांचा लाडका शिवसैनिक म्हणजे राजाभाऊ. निरलसपणे सेवा करण्याचे व्रत अंगीकरलेल्या राजाभाऊंना त्यांच्या कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाकडून १९९७ साली 'दलितमित्र' पुरस्कार देण्यात आला.

आयुष्य हे सरळमार्गी कधीच नसते. कधी सुखाचे हिंदोळे तर कधी दु:खाचे डोह अनुभवास येतात. पण म्हणून आयुष्य थांबत नाही. ते पुढे जातच असते. राजाभाऊंच्या आयुष्यात सुख ओसंडून वाहत असताना एक दिवस अचानक मोठे वादळ आले. त्यांच्या पत्नीचे सौ. सुरेखाताईंचे अकस्मात निधन झाले. या प्रसंगाचे आलेले वर्णन 'भूकंप ! सुरेखाताईंचे निधन' या प्रकरणात वाचताना आपण सारेच त्या दु:खाशी समरस होतो. राजाभाऊंच्या आयुष्यात आलेले हे कठीण वळण ! राजाभाऊ एकटे पडले होते. पण आपल्या भावना एका जागी आणि संसाराचे व्यवहार दुसऱ्या जागी. मुलांचे संगोपन, घरी येणाऱ्या - जाणाऱ्यांचे आदरातिथ्य, समाजसेवा, व्यवसाय या सगळ्या गोष्टी एकट्याने निभावणे शक्य नव्हते. यासाठी जीवनसाथीची अत्यंत आवश्यकता होती. राजाभाऊंनी दुसरा विवाह केला. या विवाहाची कथाही एखाद्या बॉलीवूड चित्रपटासारखी मनोरंजक आणि एखाद्या 'रोलर कोस्टर राईड प्रमाणे आहे.' सायन रुग्णालयातील प्रसिद्ध बालरोगतज्ञ डॉ.अलकाताई या त्यांच्या द्वितीय पत्नी. अलकाताईंनी राजाभाऊंच्या संसाराला योग्य दिशा दिली. अलकाताई आणि राजाभाऊंना पुत्ररत्नही प्राप्त झाले. अलकाताईंनी कधीही सख्खं अपत्य, सावत्र अपत्य असा भेदभाव केला नाही. आधीच्या लहानग्या जीवांना मायेची पाखर मिळाली, दु:खी जीवाला आधार लाभला, जीवन पुन्हा एकदा हास्य पांघरून पुढे जाऊ लागले.

'थोरामोठ्यांचा सहवास' या प्रकरणात राजाभाऊंच्या जीवनात आलेल्या महान व्यक्तींचा लेखकांनी परिचय करून दिला आहे. बाळासाहेब ठाकरे, उद्धव ठाकरे, राज ठाकरे, आनंद दिघे, मनोहर जोशी, अटल बिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, बाबासाहेब पुरंदरे, प्रमोद महाजन, बाळाराव सावरकर, आदि महान प्रभृतींशी त्याचे स्नेहबंध कसे विकसित होत गेले याचा आढावा घेतलेला आहे.समाजसेवा, व्यवसाय आणि संसार या तीन आघाड्यांवर काम करीत असताना राजाभाऊंनी एक चौथी आघाडी उघडली होती ती म्हणते छंद जोपासण्याची ! आपले शिक्षण कमी झाले ही खंत राजाभाऊंच्या मनात होती. परंतु त्यामुळे रडत न बसता किंवा त्याचा बाऊ न करता त्यांनी ती कसर आपल्या 'वाचन छंदाने' भरून काढली. त्याचबरोबर राजाभाऊंनी आणखीही काही चांगले छंद जोपासले होते. 'अनोख्या छंदाची कहाणी' या प्रकरणात शिवकालीन नाणी, समया, शंख, शिवचरित्राची पुस्तके इत्यादी अनेक वस्तूंचा संग्रह कसा केला, त्यांनी वस्तुसंग्रहालय कसे निर्माण केले, याचे वर्णन आले आहे. राजाभाऊंचे अक्षर हा एक वेगळा कौतुकाचा विषय. कुठलेही सुलेखनाचे शिक्षण घेतलेले नसताना राजाभाऊंनी बालपणातच मराठी सुलेखन कौशल्य (calligra- phy) आत्मसात केली आहे. त्याचाही पुढे त्यांना व्यवसाय आणि संघटना यामध्ये अत्यंत उपयोग झाला. राजाभाऊंचे हस्ताक्षर या पुस्तकामध्ये एका पानावर छापलेले आहे. राजाभाऊंनी स्वत:च्या सुवाच्य हस्ताक्षरात लिहिलेले उतारे, अनेक सुविचार, सुभाषिते, परिच्छेद स्वत:कडे यांचे संकलन केले होते. त्यातूनच 'सहज सुचलं म्हणून....' ही तीन पुस्तकांची एक मालिका त्यांनी प्रकाशित केली आहे. राजाभाऊंच्या नालासोपारा येथील निवासस्थानी त्यांचे स्वत:चे सुसज्ज वाचनालय आणि त्याचबरोबर एक संदर्भ ग्रंथालयही आहे. येथे पाच हजारपेक्षा अधिक पुस्तके आहेत. राजाभाऊंचे हे वाचनालय, वस्तुसंग्रहालय तसेच त्यांचे संदर्भ ग्रंथालय पूर्वसूचनेने कुणालाही पाहण्यासाठी आणि उपयोगासाठी उपलब्ध आहे.

अशा विविध प्रकरणांतून राजाभाऊंची ही जीवनयात्रा येऊन ठेपते 'राजा माणूस' ह्या प्रकरणाशी.. कधी उद्योगी तर कधी कुटुंबवत्सल, कधी सच्चा समाजसेवक तर कधी बांधकामाच्या साईटवर कामगारांचे प्रश्न सोडवताना आढळणारा बांधकाम व्यावसायिक अशी विविधांगी रूपे ते साकारताना राजाभाऊंच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू आपल्यासमोर येत जातात. लहानपणापासूनच अर्थार्जनासाठी नाना उद्योग करणारे हे प्रेरक व्यक्तिमत्व तरुणांसाठी मोठे प्रेरणास्थान आहे. 'कष्टाविण फळ ना मिळते' ह्या उक्तीची यथार्थता हे पुस्तक वाचत असताना आपल्याला ठाई ठाई जाणवत राहते.

आजही दादरच्या रहदारीच्या विभागात असलेल्या जाधवबंधूनी बांधलेल्या 'गार्डन कोर्ट' या उत्तुंग इमारतीच्या तिसाव्या मजल्यावर राजाभाऊंची स्वारी कधी पुस्तक वाचनात मग्न तर कधी हस्ताक्षराचे अप्रतिम नमुने साकारण्यात व्यग्र असलेली पाहायला मिळते. तुम्ही कधीही तेथे जा. तुमचे स्वागत होतेच. आपण रंगून जातो तो पुस्तकांचा प्रचंड संग्रह पाहून, हरवून जातो तो शिवकालीन नाण्यांचा संग्रह बघून, अशा ह्या चरित्रप्रवासाचे आपणही वाचन साक्षीदार व्हायलाच हवे. एकूणच हे पुस्तक ओघवती भाषा, आकर्षक रंगसंगती, अक्षराचा पोत, बांधणी, सामाजिक मूल्य अशा अनेक निकषांवर पूर्णपणे उतरते. लेखक दादासाहेब दापोलीकर यांनी सहजसोप्या, प्रवाही, प्रभावी शैलीत लिहिलेल्या एका समाजसेवकाच्या, एका सच्छील, उद्यमशील माणसाच्या कार्यकर्तृत्वाचा चढता आलेख प्रत्येकाने वाचायलाच हवा.

- रवींद्र मालुसरे

अध्यक्ष,मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई

## पाकव्याप्त काश्मीरमधील आंदोलनाचा भारताने फायदा घ्यावा

भारताचे तुकडे करून काश्मीरला स्वतंत्र राष्ट्र करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या पाकिस्तानचेच आणखी तुकडे होण्याची वेळ आली आहे असे म्हणावे लागेल कारण पाकिस्तानमधील बलुचिस्तान आणि सिंध प्रांतातील नागरिक पाकिस्तानच्या दडपलशाहीला कंटाळून पाकिस्तानमधून स्वतंत्र होण्यासाठी झटत असताना आता पाकव्याप्त काश्मीरमधील नागरिकही पाकिस्तानच्या दडपशाहीविरुद्ध रस्त्यावर उतरून आंदोलन करून पाकिस्तानातून अलग होऊन भारतात सामील होण्यासाठी आंदोलन करत आहेत. बलुचिस्तानला पाकिस्तानपासून स्वतंत्र करण्यासाठी बलुचिस्तान लिबरेशन आर्मी पाकिस्तानशी सशस्त्र लढा देत आहे. पाकिस्तान आर्मी आणि बलुचिस्तान लिबरेशन आर्मी यांच्यात सतत लढाई सुरू असते. सिंध प्रांतातील नागरिकही पाकिस्तानच्या दडपशाहीला कंटाळून रस्त्यावर उतरून पाकिस्तान सरकार विरुद्ध घोषणाबाजी करत स्वतंत्र सिंध राष्ट्राची मागणी करत असतात. आता पाकव्याप्त काश्मीरमधील नागरिक तर थेट आम्ही भारतात सामील होऊ इच्छितो म्हणत रस्त्यावर उतरून आंदोलन करत आहेत. मागील काही काळापासून पाकव्याप्त काश्मीरमधील नागरिक पाकिस्तान सरकारच्या दडपशाहीचा सामना करत आहेत. पाकिस्तान सरकार पाकव्याप्त काश्मीरमधील नागरिकांकडे दुर्लक्ष करत असून येथील नागरिकांना पुरेशा प्रमाणात सुविधा उपलब्ध करून देत नाही. पाकिस्तानमधील सरकार पाकव्याप्त काश्मीरमधील साधनसंपत्तीचे शोषण करत असून नागरिकांना कोणत्याही सुविधा देत नाही त्यामुळे तेथील नागरिकांमध्ये पाक सरकार विरुद्ध प्रचंड असंतोष होता त्यात पाकव्याप्त काश्मीरमध्ये निर्मिती केल्या जाणाऱ्या विजेचे प्रचंड बिल पाकिस्तान सरकार इथल्याच नारिकांकडून वसूल करत असल्याने पाकव्याप्त काश्मीरमधील नागरिक पाक सरकार विरुद्ध रस्त्यावर उतरले आहे. या आंदोलनाचे नेतृत्व जॉइंट अवामी ऍक्शन कमिटी ( जे ए ए सी ) ही संघटना करत आहे. पाकिस्तान या संघटनेला दहशतवादी संघटना म्हणत असली तरी या संघटनेत डॉक्टर, इंजिनिअर , वकील यासारखे उच्चशिक्षित लोक आहेत. ही संघटना आपल्या न्याय मागण्यांसाठी रस्त्यावर उतरल्या नंतर घाबरलेल्या पाकिस्तान सरकारने हे आंदोलन चिरडण्यासाठी केलेल्या गोळीबारात २० हून अधिक आंदोलकांचा बळी गेला आहे. अर्थात ही आकडेवारी पाकिस्तान सरकारची आहे. प्रत्यक्षात यापेक्षा अधिक लोकांचा बळी गेला असल्याची शक्यता पत्रकारांनी व्यक्त केली असून या गोळीबाराचा जगभरातून निषेध व्यक्त केला जात आहे. ब्रिटनमधील ५० संसद सदस्यांनी पाकव्याप्त काश्मीरमधील परिस्थिवर चिंता व्यक्त केली असून युरोपातील काही शहरात पाकिस्तानच्या अत्याचाराविरोधात निदर्शने करण्यात आली आहे. भारतानेही पाकव्याप्त काश्मीरमधील परिस्थितीवर चिंता व्यक्त करत पाकव्याप्त काश्मीरमध्ये झालेल्या गोळीबाराला मानवी संहार असे म्हटले असून यासाठी आंतरराष्ट्रीय समुदायाने पाकिस्तानला जबाबदार धरावे अशी मागणी केली आहे. पाकिस्तानने मात्र नेहमीप्रमाणे या आंदोलनाला भारताची फूस असल्याचे म्हणत या आंदोलनासाठी भारताला जबाबदार धरले आहे. हे आंदोलन करणारी जे ए ए सी ही संघटना गद्दार असून या संघटनेला भारताकडून आर्थिक पाठबळ पुरवले जात असल्याचा आरोप पाकिस्तान सरकारने केला आहे अर्थात भारताने हा आरोप फेटाळला असून पाकिस्तानमधील नागरिक सरकार विरुद्ध रस्त्यावर का उतरत आहेत याचे आत्मपरीक्षण करण्याचा सल्ला पाकिस्तान सरकारला भारताने दिला आहे. बलुचिस्तान, सिंध प्रांत आणि पाकव्याप्त काश्मीर मधील साधन संपत्तीचा पाकने वापर करून घेतला पण तेथील नागरिकांना मूलभूत सुविधा पुरवल्या नाहीत. तेथील नागरिकांवर सतत अन्याय अत्याचार केला. तेथील नागरिकांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला. नागरिकांवर बळाचा वापर करून दडपशाही केली. तेथील नागरिकांचे जगणे मुश्किल केले. महागाई प्रचंड वाढवली. तेथील नागरिकांना एकवेळेचे पुरेसे अन्न मिळणे देखील मुश्किल झाले म्हणूनच पाकव्याप्त काश्मीरमधील या आंदोलनात आम्हाला एकवेळेचे अन्न देखील मिळत नाही. अन्नासाठी आम्ही भारतातही जाऊ शकतो असे दावे काही आंदोलकांनी केले. काही आंदोलकांनी तर थेट भारतात सामील होण्याची मागणी केली. अर्थात भारताने या मागणीवर कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही मात्र आज ना उद्या भारताला यावर बोलावेच लागेल. वास्तविक भारतासाठी ही सुवर्णसंधी आहे. पाकव्याप्त काश्मीरमधील नागरिकांच्या या असंतोषाचा फायदा घेऊन भारताने पाकव्याप्त काश्मीर पाकिस्तानधून मुक्त करून भारताला जोडण्यासाठी प्रयत्न करावा अर्थात हे वाटते तितके सोपे नाही हे जरी मान्य केले तरी तरी यानिमित्ताने चालून आलेली ही संधी भारताने साधायला हवी हे ही तितकेच खरे आहे.

श्याम ठाणेदार

## आंबट गोड लेमन सोडा



कृती : लिंबू - ४ ते ५,साखर - ७ ते ८ चमचे,सोडा वॉटर - १ ग्लास,पाणी - आवश्यकतेनुसार,काळं मीठ - चवीनुसार,बर्फाचे तुकडे,पुदिन्याची पाने - ३ ते ४.


साहित्य : ताजी लिंबू घेऊन स्वच्छ धुवून त्याचा रस एका भांड्यात काढून घ्या .आता एका भांड्यात लिंबाचा रस, साखर आणी काळं मीठ घाला आणि साखर विरघळेपर्यंत चमच्याने ढवळत राहा .साखर विरघळल्यावर लेमन सिरप तयार झालं आहे .आता तयार मिश्रण सर्व्हिंग ग्लासात ओता .ग्लासात दोन ते तीन बर्फाचे तुकडे, लिंबाचे सिरप, खायचा सोडा घालून त्यावर पाणी ओता. सोडा वॉटर ग्लासात ओतताना कडेने ओतावे, एकदाच ओतू नये .सोडा घातल्यावर चमच्याने एकदाच हलक्या हाताने ढवळा. आता वरून लिंबाची चकती, पुदिन्याची पाने घालून सजवा .तयार लेमन सोडा लगेच सर्व्ह करा.

दैनिक लोकरक्षणाय

सर्व सर्जनशील वाचकांसाठी संधी





माहितीयुक्त, जागरूकता पसरवणारे, कायद्याचे ज्ञान देणारे स्वलिखित लेख





भावनात्मक, जागरूकता पसरवणारे, ज्ञान-बोध देणारी स्वलिखित कविता




पौष्टिक आणि सत्त्वयुक्त, स्वादिष्ट, आगळ्या-वेगळ्या पाककला रेसिपी




सामन्यातून असामान्य, वीरता, यश, प्रेरणात्मक, बोध कथा




महाराष्ट्रातील विविध पर्यटन स्थळांची, समृद्ध सांस्कृतिक वारशाची माहिती

ध्यास+

समुदायातील सकारात्मक आवाजांना बळकटी देण्यासाठी एक व्यासपीठ

ध्यास सकारात्मकतेचा

# मर्दिनी'च्या गीतातून अहमद खान यांचे मराठी चित्रपटसृष्टीत पदार्पण

मराठी चित्रपटसृष्टीत सध्या चर्चेत असलेल्या आगामी 'मर्दिनी' या चित्रपटाबद्दलची उत्सुकता दिवसेंदिवस वाढत आहे. नारीसामर्थ्य, मातृत्व, संघर्ष आणि आत्मविश्वासाची प्रभावी कहाणी मांडणारा हा चित्रपट ३ जुलै २०२६ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येत असून, आता चित्रपटातील एका विशेष गीताने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. या गीताला बॉलिवूडचे प्रसिद्ध कोरिओग्राफर अहमद खान यांची पहिली मराठी कोरिओग्राफी लाभली आहे, तर लोकप्रिय गायक आदर्श शिंदे यांच्या बुलंद आणि भावस्पर्शी आवाजाने या गीताला एक वेगळीच उंची प्राप्त करून दिली आहे. आशयपूर्ण शब्द, हृदयस्पर्शी संगीत, अहमद खान यांची भव्य कोरिओग्राफी आणि आदर्श शिंदे यांच्या प्रभावी आवाजाची सांगड या अनोख्या संगमामुळे 'मर्दिनी'मधील हे शीर्षक गीत चित्रपटातील एक खास आकर्षण ठरणार आहे.

या गाण्याबद्दल बोलताना अहमद खान म्हणाले, "हे गाणं करताना मला खूप आनंद झाला. श्रेयस माझा लहान भाऊ आहे आणि दीप्तीबद्दल मला खूप प्रेम आणि आपुलकी आहे. या चित्रपटाशी जोडलेल्या सर्व कलाकार, तंत्रज्ञ आणि प्रत्येक व्यक्तीसोबत काम करण्याचा अनुभव अत्यंत सुंदर होता. संपूर्ण टीमसोबत काम करताना एका कुटुंबाचा भाग असल्याची भावना निर्माण झाली."

ते पुढे म्हणाले, "हे केवळ एक गाणं नाही, तर श्रद्धा, भावना आणि प्रार्थनेचा एक सुंदर आविष्कार आहे. 'मर्दिनी' ही एका आईच्या सामर्थ्याची अनुभूती देणारी कथा आहे. चित्रपटाच्या कथानकात मातृत्वाच्या शक्तीचा आणि स्त्रीच्या जिद्दीचा अत्यंत प्रभावी आविष्कार पाहायला मिळतो. त्यामुळे या गाण्याशी भावनिकरित्या जोडले जाणे सहज शक्य झाले. तसेच मी पहिल्यांदा मराठी चित्रपटासाठी काम केले आहे."

चित्रपटाच्या संपूर्ण टीमचे कौतुक करताना त्यांनी सांगितले, "या प्रकल्पावर काम करताना प्रत्येकामध्ये एक वेगळी ऊर्जा आणि समर्पण जाणवत होते. प्रत्येकाने मनापासून काम केले आहे. या चित्रपटाचा भाग असल्याचा मला



आनंद आणि अभिमान वाटतो. मला विश्वास आहे की हे गाणं आणि चित्रपट दोन्ही प्रेक्षकांच्या मनाला स्पर्श करतील."

श्रेयस तळपदे प्रस्तुत, ॲफ्लुएन्स मोशन पिक्चर्स प्रा. लि. आणि ओ डी आय ग्रुप निर्मित 'मर्दिनी' हा चित्रपट स्त्रीच्या अस्तित्वाचा, तिच्या आत्मसन्मानाचा आणि संघर्षातून उभ्या राहिलेल्या सामर्थ्याचा प्रवास उलगडणारा आशयघन सिनेमा आहे. समाजाने आखून दिलेल्या मर्यादांना आव्हान देत स्वत:ची ओळख निर्माण करणाऱ्या स्त्रीची प्रेरणादायी कहाणी या चित्रपटातून प्रेक्षकांसमोर येणार आहे.

चित्रपटात प्रार्थना बेहेरे, अभिजीत खांडकेकर, जितेंद्र जोशी, राजेश भोसले आणि बालकलाकार मायरा वैकुळ यांच्या महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. त्यांच्या दमदार अभिनयामुळे कथेला अधिक प्रभावी परिमाण लाभले आहे. चित्रपटाचे दिग्दर्शन अजय मयेकर यांनी केले असून, निर्मिती दिप्ती तळपदे यांची आहे. सहनिर्माती टिना राकेश कोठारी आहेत. छायांकन शब्बीर नाईक, संकलन अभिषेक शेठ, संगीत हितेश मोडक तसेच पटकथा आणि संवाद महाबळेश्वर नार्वेकर यांनी चित्रपटाच्या तांत्रिक बाजूला सक्षम आधार दिला आहे. पोस्टर लॉन्चपासूनच चर्चेचा विषय ठरलेल्या 'मर्दिनी'ने प्रेक्षकांच्या मनात विशेष स्थान निर्माण करण्यास सुरुवात केली आहे. नारीशक्तीचा जयघोष, मातृत्वाच्या सामर्थ्याला सलाम आणि संकटांशी दोन हात करणाऱ्या स्त्रीच्या अदम्य जिद्दीची कहाणी घेऊन येणारा हा चित्रपट केवळ मनोरंजनापुरता मर्यादित न राहता प्रेक्षकांना विचार करायला भाग पाडणारा अनुभव ठरणार आहे. भावनिक कथानक, प्रभावी कलाकार, हृदयस्पर्शी संगीत आणि आशयपूर्ण मांडणी यांच्या जोरावर 'मर्दिनी' हा यंदाच्या वर्षातील सर्वाधिक चर्चेत राहणाऱ्या मराठी चित्रपटांपैकी एक ठरण्याची चिन्हे आहेत. येत्या ३ जुलै २०२६ रोजी ही प्रेरणादायी कथा रुपेरी पडद्यावर अवतरणार असून, प्रेक्षकांच्या मनावर आपली अमिट छाप उमटवण्यासाठी सज्ज झाली आहे.

# कृष्णाईच्या लेकीतील शारदा साकारताना एकताने घेतली विशेष मेहनत

अभिनेत्री एकता लब्दे हिच्या चाहत्यांसाठी आनंदाची बातमी आहे, एकता 'कृष्णाईच्या लेकी' या मालिकेत 'शारदा' ही महत्त्वपूर्ण भूमिका साकारताना दिसणार आहे. आपल्या सहजसुंदर अभिनयाने आणि निरागस व्यक्तिमत्त्वाने प्रेक्षकांची मनं जिंकणाऱ्या एकताने याआधीही अनेक भूमिकांमधून स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली आहे. 'कृष्णाईच्या लेकी' मधील शारदा ही समजूतदार, जबाबदार आणि कुटुंबासाठी स्वत:च्या भावनांनाही बाजूला ठेवणारी मुलगी असून, या भूमिकेद्वारे एकता प्रेक्षकांसमोर एका नव्या रूपात येत आहे."माझ्या व्यक्तिरेखेचं नाव शारदा आहे. शारदा ही शांत आणि अबोल आहे. शारदा मनातलं मनात ठेवणारी, शांत आणि समजूतदार आहे, शारदाच्या भूमिकेसाठी मला बऱ्याच गोष्टी ॲडजस्ट कराव्या लागत आहेत, कारण माझे आणि शारदाचे स्वभावगुण खूपच वेगळे आहेत. शारदा कृष्णाईची सावली आहे. त्यामुळे तिला तिच्या दोन बहिणींचाही आईसारखाच सांभाळ करावा लागतो. याआधीची माझी भूमिका प्रेमळ होती, त्यामुळे मला ही भूमिका साकारताना थोडं सोपं जात आहे. थोडासा कृष्णाईसारखा स्वभाव जुळवून आणण्याच्या प्रयत्नात आहे. मला या भूमिकेसाठी कॉल आला होता आणि माझं ऑडिशन ठाण्यात झालं. मुळात त्यांना प्रेमळ, सौजन्यशील, साधी, सुंदर आणि समजूतदार असा चेहरा हवा होता. शारदाच्या भूमिकेसाठी मी त्यांना योग्य वाटले, याचा मला आनंद आहे. जेव्हा मला समजलं की 'कृष्णाईच्या लेकी'मध्ये कृष्णाईच्या मुलीच्या भूमिकेसाठी माझी निवड झाली आझाली आहे, ते ऐकून मला फार आनंद झाला.



खूप महिन्यांनंतर मी पुन्हा कॅमेरा फेस करत होते. शूटिंगचा पहिला दिवस खूप छान होता. अभिनय ही माझी आवड आहे. आज माझ्याकडे काम आहे. यासाठी मी स्वत:ला खूप भाग्यवान समजते. फार कमी लोकांना असं भाग्य लाभतं. पहिल्या दिवसाच्या शूटिंगमध्ये मला थोडी धाकधूक होती, कारण या भूमिकेसाठी कोल्हापूरकडची भाषा वापरायची होती, माझी या आधीची भूमिका वेगळ्या ढंगाची होती. मुळात मी कोकणातील असल्यामुळे मला भाषेवर काम करावे लागले. मी स्थानिक लोकांचे निरीक्षण मी करत असते. मला फक्त भाषेचं टेन्शन होतं की मी योग्य बोलते आहे का. पण सेटवर सगळे कलाकार आणि दिग्दर्शक इतके कमाल आहेत की ते सगळं समजावून सांगतात आणि सांभाळून घेतात.

मुंबईच्या बाहेर शूटिंग करणं माझ्यासाठी कठीण आहे. कुटुंबाला सोडून शूटिंगसाठी मुंबईबाहेर राहणं अवघड वाटत. पण सुरुवातीचं शूटिंग साताऱ्यात होत आणि सुदैवाने माझी टीम खूप चांगली आहे. आमचं प्रॉडक्शन हाऊस खूप सपोर्टिव्ह आहे आणि सहकलाकारही कमाल आहेत. त्यामुळे मुंबईबाहेर राहून शूटिंग करणं सोपं वाटलं . सहकलाकार आणि टीम उत्तम आहेत. माझं, नारायणीचं आणि ट्विंकलचं खूप कमी वेळात छान बॉण्डिंग झालं आहे. मी आणि नारायणी आधीपासून एकमेकींना ओळखत होतो. आम्ही तिघी सेटवरही सख्या बहिणींप्रमाणे वावरतो. निवेदिता ताई आम्हाला खूप चांगल्या पद्धतीने समजून घेतात. पहिल्या दिवशी मला खूप टेन्शन होतं की माझ्यामुळे सीनचे रिटेक्स नको व्हायला. पण सगळे खूप समजूतदार आहेत. मुंबईबाहेर शूट असल्यामुळे एकत्र राहिल्यामुळे आमची खूप छान टीम तयार झाली आहे.

निवेदिता ताई कृष्णाईची भूमिका साकारणार आहेत हे कळल्यावर माझा आनंद अनावर झाला होता. मला निवेदिता सराफ, अश्विनी भावे आणि अलका कुबल या मराठीतील दिग्गज अभिनेत्री खूप आवडतात. मराठीत निवेदिता ताई आणि हिंदीत नीतू सिंग या माझ्या अत्यंत आवडत्या अभिनेत्री आहेत. त्यांचे चित्रपट पाहत मी लहानाची मोठी झाले. अभिनय करण्यासाठी प्रेरणा मला त्यांच्या भूमिकांमधून मिळाली आहे .निवेदिता ताई स्वभावाने खूप छान आहेत.

# मराठी चित्रपटसृष्टी गाजवल्यानंतर आता प्राजक्ता माळीची साऊथमध्ये एंट्री



मराठी मनोरंजन विश्वातील लोकप्रिय अभिनेत्री प्राजक्ता माळी आता आपल्या कारकिर्दीतील नव्या पर्वाला सुरुवात करत आहे. अभिनय, सूत्रसंचालन, नृत्य, चित्रपट निर्माती आणि उद्योजिका अशा विविध क्षेत्रांत स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केलेली प्राजक्ता आता दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीत पदार्पण करण्यासाठी सज्ज झाली आहे.

मराठी मालिकांपासून चित्रपटांपर्यंत अनेक संस्मरणीय भूमिका साकारत प्राजक्ताने प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. तिच्या सहजसुंदर अभिनयशैलीमुळे आणि विविधांगी व्यक्तिमत्त्वामुळे ती घराघरांत लोकप्रिय झाली. आता ती दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीतही आपल्या अभिनयाची छाप उमटवण्यासाठी सज्ज असल्याने चाहत्यांमध्ये उत्सुकतेचं वातावरण आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्राजक्ताच्या आगामी तेलुगू चित्रपटाचं चित्रीकरण सध्या सुरू आहे व तो ह्याच वर्षी प्रदर्शित होईल. या चित्रपटाची कथा, कलाकारांची फळी आणि प्राजक्ताची भूमिका याविषयीची अधिक माहिती लवकरच आपल्यासमोर येईल, असं प्राजक्ता म्हणाली. त्यामुळे या प्रोजेक्टबाबतची उत्सुकता आणखी वाढली आहे.

प्राजक्ता या चित्रपटात नेमक्या कोणत्या भूमिकेत दिसणार, तिचा लूक कसा असेल आणि ती कोणत्या कलाकारांसोबत झळकणार, याबाबत चाहत्यांमध्ये विविध चर्चांना उधाण आलं आहे. मराठी मनोरंजन विश्वात यशस्वी वाटचाल केल्यानंतर आता तेलुगू चित्रपटसृष्टीतील तिच्या नव्या प्रवासाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# 'देऊळ बंद २' च्या कमाईतील प्रत्येक रुपया शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणावर खर्च करणार - प्रवीण तरडे यांची घोषणा

संपूर्ण राज्यभरात गाजत असलेला 'देऊळ बंद-२' या चित्रपटानं केवळ वीस दिवसांमध्ये ७५ कोटी रुपयांचा व्यवसाय केलाय. चित्रपटाची वाटचाल शंभर कोटीच्या क्लब'च्या दिशेनं अगदी जोरात सुरू आहे. 'देऊळ बंद- २' चित्रपटाला प्रेक्षकांचा तुफान प्रतिसाद मिळतो आहे. या चित्रपटाच्या व्यवसायातून मिळणाऱ्या नफ्यातील रुपया न रुपया हा शेतकरी मुलांच्या शिक्षणासाठी खर्च करणार असल्याची घोषणा 'देऊळ बंद २'चे लेखन आणि दिग्दर्शन प्रवीण विठ्ठल तरडे यांनी केली आहे. ते नागपूर येथे आले होते. ज्यावेळी 'देऊळ बंद २' या चित्रपटाचं चित्रीकरण सुरू होतं, त्यावेळी मराठवाड्यात दुष्काळ परिस्थिती निर्माण झाली होती. त्यावेळी चित्रीकरण सोडून मी आणि सहकारी मदतीला गेलेलो होतो, त्यावेळी १९ लाख रुपयांची मदत गोळा



झाली होती, असं प्रवीण तरडे म्हणाले आहेत.

**शेतकरी आत्महत्यांवर तोडगा :** आपल्या राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचं प्रमाण अंतर्मुख करायला लावणारं आहे. 'देऊळ बंद २' हा चित्रपट त्यावरील तोडगा ठरू शकतो, असा आशावाद चित्रपटाचे दिग्दर्शन प्रवीण तरडे यांनी व्यक्त केलाय. ते म्हणाले की, माझा चित्रपट बघितल्यानंतर ज्या शेतकऱ्यांच्या किंवा इतर कुणाच्या मनात जर आत्महत्या करण्याचा नकारात्मक विचार येत असेल ते विचार दूर होतील असं ते म्हणाले.

**विज्ञान विरुद्ध श्रद्धा असा संगम :** २०१३ साली प्रदर्शित झालेल्या 'देऊळ बंद' या चित्रपटानं मराठी प्रेक्षक पसंतीची पावती मिळवली होती. श्रद्धा विरुद्ध विज्ञान यांच्यातलं द्वंद्व दाखवणाऱ्या या चित्रपटानं त्या बॉक्स ऑफीसवर उत्तम कमाई केली होती. तब्बल ११ वर्षांनंतर प्रदर्शित झालेल्या 'देऊळ बंद २' या बहुचर्चित सीक्वेलनेही प्रदर्शित होताच मराठी चित्रपटसृष्टीत ब्लॉकबस्टर एन्ट्री करत प्रेक्षकांचा तुफान प्रतिसाद मिळवला आहे. 'देऊळ बंद' आणि 'देऊळ बंद २' दोन्ही चित्रपटांमध्ये दिग्गज अभिनेता मोहन जोशी यांनी श्री स्वामी समर्थ यांची व्यक्तिरेखा साकारली आहे.

# दारूपेक्षाही जास्त वेगाने लिव्हर खराब करते 'ही' ड्रिंक! डॉक्टरांनी दिला गंभीर इशारा...

जेव्हा यकृताला (लिव्हरला) नुकसान करणाऱ्या गोष्टींचा विषय निघतो, तेव्हा बहुतेक लोकांच्या डोळ्यासमोर सर्वप्रथम दारू (अल्कोहोल) येते. सामान्यत: असे मानले जाते की जर तुम्ही दारू पीत नसाल, तर लिव्हर खराब होण्याची शक्यता खूपच कमी असते. पण हे पूर्णपणे खरे नाही. कारण आजकाल फॅटी लिव्हर आणि लिव्हरशी संबंधित अनेक समस्या अशा लोकांमध्येही दिसून येतात, जे दारूचे सेवन करत नाहीत.

कदाचित तुम्हाला आश्चर्य वाटेल, पण एक अशी पेयांची श्रेणी आहे जी दारूपेक्षाही अधिक वेगाने लिव्हरचे नुकसान करत आहे. याचे कारण म्हणजे अनेक लोक ही पेये दररोज पितात आणि त्यांचे दुष्परिणाम त्यांना माहीतही नसतात. चला जाणून घेऊया ही पेये कोणती आहेत.

**लिव्हरचे वेगाने नुकसान करणारी ही पेये**

प्रसिद्ध गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट डॉ. सौरभ सेठी यांच्या मते, लिव्हरचे सर्वात वेगाने नुकसान करणारी गोष्ट दारू नाही, तर अशी पेये आहेत जी अनेक लोक रोज पितात. यामध्ये सोडा, एनर्जी



ड्रिंक्स आणि साखरयुक्त पेयांचा समावेश होतो. ही पेये लिव्हरचे सर्वाधिक आणि सर्वात वेगाने नुकसान करतात.

ही पेये दारूपेक्षाही अधिक धोकादायक ठरू शकतात, कारण अनेक लोक त्यांचे दुष्परिणाम न जाणता त्यांचे दररोज सेवन करतात.

**ही पेये लिव्हरचे नुकसान कसे करतात?**

डॉ. सौरभ सांगतात की ही पेये द्रवरूपात असल्यामुळे त्यामध्ये फायबर नसते. त्यामुळे ती शरीरात खूप लवकर शोषली जातात. यामुळे रक्तातील ग्लुकोज आणि फ्रुक्टोजचे प्रमाण झपाट्याने वाढते.

फ्रुक्टोजची प्रक्रिया मुख्यत: लिव्हरमध्ये होते. जेव्हा शरीरात फ्रुक्टोजचे प्रमाण सतत जास्त राहते, तेव्हा लिव्हर त्यातील काही भागाचे रूपांतर चरबीत (फॅटमध्ये) करू लागते. ही चरबी हळूहळू लिव्हरमध्ये साचते आणि त्यामुळे फॅटी लिव्हरची समस्या निर्माण होते.

डॉक्टरांच्या मते, नियमितपणे साखरयुक्त पेये पिणे हे फॅटी लिव्हर होण्यामागील प्रमुख कारणांपैकी एक आहे. विशेषत: जर तुम्ही फारशी शारीरिक हालचाल करत नसाल किंवा आधीपासूनच जास्त साखरेचे सेवन करत असाल, तर हा धोका आणखी वाढतो.

**साखरयुक्त पेये बंद केल्यास शरीरात होणारे बदल**

जर तुम्ही ही साखरयुक्त पेये पिणे बंद केले, तर शरीरात लगेचच सकारात्मक बदल दिसू लागतात. डॉक्टर सांगतात की अशी पेये सोडल्यानंतर लिव्हरवरील चरबीचा ताण कमी होऊ लागतो आणि शरीरावरील चयापचयाचा (मेटाबॉलिक) ताणही कमी होतो.

या पेयांच्या ऐवजी तुम्ही पुरेसे पाणी, स्पार्कलिंग वॉटर, ग्रीन टी, ब्लॅक कॉफी आणि ब्लॅक टी यांचा आहारात समावेश करू शकता. ही पेये लिव्हरला हानी पोहोचवत नाहीत, उलट त्याच्या आरोग्यासाठी फायदेशीर ठरू शकतात.




■ मेष : घर-वाहन खरेदीबाबतीत महत्त्वाचा निर्णय घेता येईल. थकबाकी वसूल करा.

■ वृषभ : नातलगांच्या भेटीगाठी होतील. दिवस आनंदात जाईल, बंदा महत्त्वाचा आहे त्यावर लक्ष द्या. स्पर्धेत पुढे जाल.

■ मिथुन : रस्त्याने चालताना सावधगिरी ठेवा. खर्च वाढेल. वादाला महत्त्व देऊ नका. रागावर ताबा ठेवा. शांत राहा.

■ कर्क : कला-क्रीडा क्षेत्रात मान-प्रतिष्ठा वाढणारी घटना घडेल.

■ सिंह: सामाजिक कार्यात मान-अपमानाचा विचार करू नका, कार्य करत राहा.

■ कन्या: घरातील वातावरण आनंदी राहील. घरातील सदस्यांसाठी मोठी खरेदी कराल, व्यवसायात नवीन काम मिळेल.

■ तूळ : सामाजिक कार्यात कामाचा व्याप वाढेल. काम करताना घाई करू नका.

■ वृश्चिक : राजकीय क्षेत्रात तुमचा अंदाज बरोबर येईल. कामात आळस करू नका. प्रतिष्ठा मिळवण्यासाठी कष्ट घ्या.

■ धनु : अपेक्षा असलेली व्यक्ती भेटल्याचे समाधान मिळेल.

■ मकर : तुमच्या नव्या विचारांना चालना मिळेल.

■ कुंभ: उतावळेपणा न करता तुमचे विचार मांडा. विलंबाने तुमचे काम होईल. धीर ठेवा.

■ मीन: नवीन ओळख होईल. कला-क्रीडा स्पर्धेत कष्ट घ्या. व्यवसायाला कलाटणी मिळेल. नवे काम मिळेल.

# शरद पवारांच्या राष्ट्रवादीचा काँग्रेसमध्ये विलीनीकरणाचा प्रस्ताव!

मुंबई (विशाल कारंडे) : मागील काही दिवसांपूर्वी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाच्या सुरू असलेल्या चर्चेला खासदार सुप्रिया सुळे यांनी पूर्णविराम दिला. त्यानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष काँग्रेसमध्ये विलीन करण्याच्या प्रस्तावाबाबत चर्चा सुरू झाली आहे. "राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या विलीनीकरणाचा प्रस्ताव यापूर्वीच शरद पवार यांनी दिला होता. मात्र, काही कारणांमुळं त्यावर निर्णय घेण्यास विलंब झाला," असा दावा शुक्रवार (दि.१२) काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी केला.

**विलीनीकरणाचा मुद्दा आता का उपस्थित होतोय? :** काही दिवसांपूर्वी इंडिया आघाडीची बैठक पार पडली. या बैठकीत काँग्रेस आणि पक्षापासून वेगळं होऊन स्थापन केलेल्या प्रादेशिक पक्षांच्या भविष्यातील राजकीय भूमिकेवर चर्चा झाली. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखाली तृणमूल काँग्रेसनं सलग तीन कार्यकाळ सत्ता राखली होती. मात्र, २०२६च्या विधानसभा निवडणुकीत भाजपानं विजय मिळवल्यानंतर राज्यातील अनेक खासदार आणि आमदारांनी पक्षांतराचा मार्ग स्वीकारल्याची चर्चा सुरू झाली. त्यानंतर ममता बॅनर्जी यांनी सोनिया गांधी, तर अभिषेक बॅनर्जी यांनी राहुल गांधी यांची भेट घेतली होती. या भेटींमध्ये तृणमूल काँग्रेसच्या संभाव्य विलीनीकरणाबाबत बोललं जात होतं. याच घडामोडींचा धडा घेत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं भविष्यातील राजकीय अनिश्चितता टाळण्यासाठी काँग्रेसशी अधिक जवळीक साधण्याचा प्रयत्न सुरू केल्याची चर्चा सुरू आहे.




**पटोलेंच्या वक्तव्यामुळं विलीनीकरणाच्या चर्चांना बळ :** "देशातील सध्याची राजकीय परिस्थिती आणि संविधानिक संस्थांसमोरील आव्हानं लक्षात घेता धर्मनिरपेक्ष मतांचं विभाजन थांबणं गरजेचं आहे. देश आणि संविधान वाचवण्यासाठी समान विचारसरणीच्या सर्व धर्मनिरपेक्ष पक्षांनी एकत्र येण्याची आवश्यकता आहे. त्या दृष्टीनं प्रक्रिया सुरू झाली आहे," असं वक्तव्या काँग्रेस नेते नाना पटोले यांनी केलं. पटोले यांच्या या वक्तव्यामुळं काँग्रेस आणि काँग्रेसमधून निर्माण झालेल्या प्रादेशिक पक्षांच्या संभाव्य एकजुटीच्या चर्चांना आणखी बळ मिळाले आहे.

**समविचारी शक्तींनी एकत्र आलं पाहिजे :** "काँग्रेसमधून वेगळे झालेले पक्ष आणि नेत्यांनी देशातील सध्याची राजकीय परिस्थिती लक्षात घेऊन पुन्हा एकत्र येण्याची गरज आहे. काँग्रेसमधून बाहेर पडून स्थापन झालेले छोटे पक्ष आणि नेत्यांनी देशाची परिस्थिती समजून घेतली पाहिजे. देशात काँग्रेस हा एक मजबूत, अखंड आणि सक्षम पर्याय म्हणून उभा राहणं आवश्यक आहे. त्यासाठी सर्व समविचारी शक्तींनी एकत्र आलं पाहिजे. या प्रक्रियेत शरद पवार यांनी पुढाकार घ्यावा," असं मत शिवसेना (उबाठा) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी व्यक्त केलं.

## नाना पटोलेंचा खळबळजनक दावा

**विलीनीकरणा प्रस्ताव? :** राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना १९९०मध्ये काँग्रेसमधून विभक्त होऊन झाली. स्वतंत्र राजकीय अस्तित्व निर्माण केलं असलं तरी दोन्ही पक्षांची वैचारिक भूमिका जवळपास समान असल्याचा दावा राष्ट्रवादीकडून सातत्यानं करण्यात आला. १९९९ पासून २०१४चा अपवाद वगळता काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसनं बहुतेक निवडणुका एकत्र लढवल्या आणि सत्तेतही भागीदारी कायम ठेवली. मात्र, तीन वर्षांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उभी फूट पडली. त्यानंतर शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील पक्षानं महाविकास आघाडीत राहणं पसंत केलं, तर अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील पक्ष महायुतीमध्ये सहभागी झाला. दरम्यान, बदलत्या राजकीय समीकरणांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं विलीनीकरणाचा काँग्रेसला प्रस्ताव दिल्याची चर्चा दबक्या आवाजात सुरू आहे.

**राजधानी दिल्लीत काँग्रेसची खलबत :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून काँग्रेसमध्ये विलिनीकरणासंदर्भात कोणताही प्रस्ताव दिलेला नसल्याचं स्पष्ट करत पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी सुरू असलेल्या चर्चांना पूर्णविराम देण्याचा प्रयत्न केला. गुरुवारी दिल्लीत काँग्रेसची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीला काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, पक्षाचे सरचिटणीस, विविध राज्यांचे प्रभारी आणि प्रदेशाध्यक्ष उपस्थित होते. दुसरीकडं, बुधवारी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा वर्धापनदिन साजरा झाला. या दोन घडामोडींच्या पार्श्वभूमीवर विलीनीकरणाच्या चर्चा सुरू झाल्या आहेत.



# Shakira, Andrea Bocelli And Salma Hayek Kick-Start World Cup At Opening Ceremony In Mexico City

Mexico City: Shakira, Man, Andrea Bocelli and a surprise appearance by Salma Hayek lit up the World Cup opening ceremony ahead of Mexico's 2-0 victory over South Africa on Thursday.

Shakira performed "Dai Dai," the tournament's official song, with Burna Boy. The Colombian star had a hit with "Waka Waka (This Time For Africa)" from the 2010 World Cup in South Africa and now seeks to score again.

A good World Cup song, Shakira earlier told The Associated Press, "needs to definitely have rhythm. It has to be rhythmic. It has to make people want to dance. And it has to be an anthem as well. It has to make people want to sing along in unison, sing out loud at the top of their lungs."

Shakira has performed at previous World Cups, too: 2006 in Germany, 2010 in South Africa, and 2014 in Brazil.

In addition, she will perform at the first halftime show of a World Cup final on July 19 at MetLife Stadium in New Jersey with Madonna and BTS. Mexico, the United States and Canada are co-hosting the 48-team tournament.

**A welcome for all**


Lila Downs welcomed fans and players in Spanish, English, and the indigenous languages Mixtec and Nahuatl.

"People of the world, welcome to Mexico," said Downs, who wore a white indigenous huipil with a lilac edge. "Mexico welcomes you with smiles from our heart, we are a nation of diversity, heritage and pride in ancestral lands where movement and ritual spirit endure."

Downs, who is a singer-songwriter, was born in Tlaxiaco, Oaxaca. Her mother is Mixtec, and her father was American of Scottish descent. But her heart is green, white and red when it comes to the ball.

"It's a great honor for me to represent my beautiful and diverse country," Downs said in an interview with The AP. "Of course I'm going to root for Mexico's team, Viva Mexico!"

Shakira, Andrea Bocelli And Salma Hayek Kick-Start World Cup At Opening Ceremony In Mexico City



Performers on the pitch during the opening ceremony before the start of the World Cup Group A soccer match between Mexico and South Africa in Mexico City (AP)

**Man thrills fans**

Man electrified the stadium with "Oye Mi Amor" surrounded by pre-Hispanic dancers who moved their head plumes to the rhythm of rock while tens of thousands of fans chanted.

The band, founded in 1986, has sold more than 40 million records.

Shortly before their performance, they announced that they will be touring in Latin America, including stops in Bogot, Lima, Santiago, Buenos Aires, and Mexico City.

**From Iztapalapa to the World Cup**

The Mexican cumbia group Los angeles Azules performed "Por Ella" with Belinda, one of the most danceable songs of FIFA's official World Cup album.

The band, founded in the mid-70s by the Meja Avante brothers, is originally from the district of Iztapalapa, a working-class area of Mexico City, so their battle cry is "From Iztapalapa to the world!"

J Balvin had a dynamic performance — he started driving a cardboard car with "Que Calor" and then he was accompanied by Ryan Castro for "Una A La Vez" before ending with "I Like It," a hit he originally released with Cardi B and Bad Bunny.

The Colombian star has experience on world stages. In 2020, he participated in the Super Bowl halftime as a guest of Shakira and Jennifer Lopez.

Danny Ocean performed "Partidazo" — his collaboration for the FIFA album. Ocean was surrounded by dancers wearing a modern take on the traditional dresses of the Mexican state of Jalisco, modified to have hoodies on top.

Two Labubus could be seen wearing soccer jerseys after the presentation of Los angeles Azules and Belinda. One brown Labubu wore a jersey with the number 10 and the legend "The Monsters" and the other wore a shirt with the logo of the 2026 World Cup.

Shakira, Andrea Bocelli And Salma Hayek Kick-Start World Cup At Opening Ceremony In Mexico City

Mexican pop rock band Mana perform before the start of the World Cup Group A soccer match between Mexico and South Africa in Mexico City, (AP)

**Hollywood power at the ceremony**

Actress and producer Salma Hayek, a big soccer fan, gave a brief welcome speech during the first protocol parade of a World Cup in which the 48 flags of the participating countries could be seen.

"Mexicans are very honored that this is where the first match of this wonderful soccer tradition that unites us all begins," Hayek, who is originally from the Mexican state of Veracruz, said in Spanish. "Long live Mexico and long live soccer!"

Hayek has been appointed an ambassador for the 2026 World Cup.

**Opera and K-pop united**

Italian tenor Andrea Bocelli and South Korean star EJAE performed "DNA," the tournament's official anthem, with French DJ and producer David Guetta at the flag parade.

Bocelli has just performed for more than 130,000 fans in April at Mexico City's Zcalo. EJAE is famous for being the voice of the character Rumi in the film "KPop Demon Hunters" and for being one of the composers of the Oscar-winning song "Golden" from the animated film.

# BAN vs AUS: Bangladesh Register Maiden ODI Series Win Over Australia With Five-Wicket Win In Dhaka

Hyderabad : Bangladesh beat Australia by five wickets in the second ODI of the three-match series, played in Dhaka and took an unassailable 2-0 lead in the series. With the triumph, they registered their first series win over the Australian side in their cricket history. Chasing a revised DLS target of 192 after rain interrupted the play, the hosts overcame the nerves to take an unassailable lead in the series.

After Australia played 42 overs in their innings, the rain interrupted the proceedings, and so Bangladesh were handed a revised target of 192. The hosts chased down the target with ease as it was a collective effort from the batters in the middle. Soumya Sarkar (42), Najmul Hossain Shanto (41) and Towhid Hridoy (40 Not Out) contributed to help the team take down the target in just 35 overs and five wickets in hand. Except for Nathan Ellis, all the bowlers took one wicket each.



Earlier in the match, Australia had a troublesome start, losing three wickets on 0. Soon, they were reduced to 25/4 within just 7.3 overs. After the team was reduced to 81/6, Marnus Labuschagne (55 Not Out) and Xavier Bartlett (52) orchestrated a revival with a partnership of 103 runs from 115 deliveries for the seventh wicket. Josh Inglis scored 34 runs, but none of the other batters managed to step up in the crucial situation. Taskin Ahmed and Mustafizur Rahman picked three wickets each.

Earlier, in 2005, Bangladesh pulled off an upset when they beat Australia in the NatWest Tri-Series by five wickets in Cardiff. However, the team took a step further, taking an unassailable lead and winning the three-match series.

The two teams will also play three T20I matches against each other, and the Australian side will be aiming to make a comeback in the shortest format of the game. Najmul Hossain Shanto has been the leading run-scorer in the series so far, amassing 108 runs from two matches. Mustafizur Rahman has been the leading wicket-taker with five scalps from two matches to his name.

# महाराष्ट्र शासन आणि इंडियन डेंटल असोसिएशनमध्ये दंत पर्यटनाला चालना देण्यासाठी सामंजस्य करार

● मुंबई, विशाल कारंडे :

विकसित महाराष्ट्र २०४७या राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी संकल्पनेच्या अनुषंगाने राज्यात दंत पर्यटन (डेंटल टुरिझम) क्षेत्राला चालना देण्यासाठी महाराष्ट्र शासन आणि इंडियन डेंटल असोसिएशन (आयडीए) यांच्यात सामंजस्य करार (एमओयू) करण्यात आला आहे. राजशिष्टाचार, परकीय गुंतवणूक, डायसपोरा आणि आऊटरीच विभागाच्या पुढाकाराने हा करार करण्यात आला.

मुंबई येथे झालेल्या कार्यक्रमात महाराष्ट्र शासनातर्फे सचिव डॉ. राजेश गवांदे आणि उप सचिव अविनाश सोलावट तसेच इंडियन डेंटल असोसिएशनतर्फे मानद सरचिटणीस डॉ. अशोक ढोबळे यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

राज्यात पर्यटनाच्या नव्या संधी निर्माण करणे, विविध क्षेत्रांमध्ये परकीय गुंतवणूक आकर्षित करणे आणि महाराष्ट्राला जागतिक स्तरावरील आरोग्यसेवा केंद्र म्हणून विकसित करणे या उद्देशाने हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या कराराद्वारे महाराष्ट्राला दंत आरोग्य आणि उपचारांसाठी सुरक्षित, पारदर्शक आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक केंद्र म्हणून विकसित करण्यावर भर देण्यात येणार आहे.



या सामंजस्य कराराअंतर्गत देश-विदेशातील रुग्णांना महाराष्ट्रातील दंत उपचार सुविधा, टेलि-कन्सल्टेशन सेवा आणि अन्य आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रोत्साहन दिले जाणार आहे. तसेच दंत आरोग्य क्षेत्रातील प्रशिक्षण, उपचार, संशोधन आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांना चालना देण्यासाठी दोन्ही संस्था परस्पर सहकार्य करणार आहेत.

मार्गदर्शन, संवाद सहाय्य आणि विविध विभागांशी समन्वय साधण्यासाठी शासन मदत करेल. तर इंडियन डेंटल असोसिएशन प्रशिक्षण, संशोधन, नवोपक्रम आणि हितधारकांच्या सहभागासाठी आवश्यक सहाय्य उपलब्ध करून देईल. दंत पर्यटनाला जागतिक स्तरावर प्रोत्साहन देण्यासाठी विविध बैठका, कार्यशाळा, परिषद आणि जनजागृती कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात येणार आहे.

यामुळे महाराष्ट्राच्या आरोग्य पर्यटन क्षेत्राला नवी दिशा मिळण्याबरोबरच राज्याच्या आर्थिक विकासालाही हातभार लागणार आहे.

हा करार तीन वर्षांच्या कालावधीसाठी लागू राहणार असून तो अबाध्य (Non-Binding) आणि गैर-आर्थिक स्वरूपाचा आहे. कोणत्याही प्रकारची आर्थिक बांधिलकी या करारातून निर्माण होणार नसून विशिष्ट प्रकल्पांसाठी स्वतंत्र करार करण्यात येणार आहेत. हा करार केवळ सहकार्याची रूपरेषा निश्चित करणारा इच्छापत्र स्वरूपाचा असून त्यातून कोणतेही कायदेशीर अथवा आर्थिक बंधन निर्माण होणार नाही. कराराचा कालावधी तीन वर्षांचा असून कोणत्याही पक्षाला ३० दिवसांची लेखी नोटीस देऊन करारातून बाहेर पडता येणार आहे.

या उपक्रमामुळे महाराष्ट्राला दंत पर्यटनाच्या क्षेत्रात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर नवे स्थान प्राप्त होण्यास मदत होईल, तसेच राज्यातील आरोग्य पर्यटनाला चालना मिळून रोजगार, गुंतवणूक आणि आरोग्यसेवा क्षेत्राच्या विकासाला बळ मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# पुनर्भरणाची व्यवस्था करा!

## पावसाच्या पाण्याबाबत आयुक्त अश्विनी भिडे यांचे निर्देश

● मुंबई, विशाल पाटील :

यंदा पावसाचे आगमन लांबणीवर पडेल, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. या पार्श्वभूमीवर विहिरींची स्वच्छता करत पिण्या व्यतिरिक्त वापर करण्यासाठी प्रोत्साहित करावे, पावसाच्या पाण्याच्या पुनर्भरणाची व्यवस्था उभारावी, असे निर्देश मुंबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनी संबंधित यंत्रणांना दिले आहेत.

सिमेंट काँक्रीटीकरण पूर्ण झाल्यावर राडारोडा, इतर साहित्य, रस्तेरोधक (बॅरिकेड्स) तातडीने हटवावेत, खड्डेमुक्त रस्त्यांसाठी सिमेंट काँक्रीकटचे रस्ते करण्यावर भर दिला आहे. खड्ड्यांची तक्रार प्राप्त होताच २४ तासांत बुजवा, असे निर्देश त्यांनी दिले. अपघातांची संख्या कमी करण्यासाठी आराखडा तयार करा, असे निर्देश त्यांनी दिले.



मुंबईतील जलसाठ्याचे सुयोग्य व्यवस्थापन करण्यासाठी पारंपरिक जलस्रोतांचे पुनरुज्जीवन आणि पर्यायी स्रोतांचा वापर करणे गरजेचे आहे. वाढती लोकसंख्या आणि हवामानातील बदलांमुळे पाणी व्यवस्थापन आव्हानात्मक बनले आहे. मुंबईतील सर्व सार्वजनिक, शासकीय आणि खासगी विहिरी तसेच कूपनलिकांची अद्ययावत माहिती सर्व प्रशासकीय विभागांच्या (वॉर्ड) सहाय्यक आयुक्तांनी संकलित करावी. विहिरींची दुरुस्ती करताना त्या वापरात येतील याची खात्री करावी. खासगी गृहनिर्माण संस्थांनी पुढाकार घेऊन या पाण्याचा वापर करावा. यासाठी स्थानिक नगरसेवक, प्रशासन आणि गृहनिर्माण संस्था यांनी समन्वय साधावा, असे भिडे यांनी नमूद केले.

रस्त्यांच्या दुतर्फा होणारे अनधिकृत पार्किंग रोखण्यासाठी कठोर उपाययोजना कराव्यात. पालिकेच्या सार्वजनिक वाहनतळांचा अधिकाधिक वापर नागरिक आणि रहिवाशांकडून होईल, यासाठी जनजागृती व प्रोत्साहनात्मक उपक्रम राबवावेत. रस्त्यांवरील बेवारस व दीर्घकाळ उभी असलेली वाहने हटविण्यासाठी वाहतूक पोलीस आणि परिवहन विभागाशी समन्वय साधून विशेष मोहीम हाती घ्यावी. शाळा, रुग्णालये आणि इतर महत्त्वाच्या सार्वजनिक संस्थांच्या परिसरात वाहतूककोंडी होऊ नये, यासाठी स्थानिक परिस्थितीनुसार नियोजनबद्ध उपाययोजना राबवाव्यात.

# जुहू येथे अग्निभडका; आठ जखमी

● मुंबई, राकेश गायकवाड :

वाढत्या उन्हामुळे बहुतांश घरात एसीचा वापर वाढला आहे. एसीचा सतत वापर होत असल्याने अंधेरी जुहू येथील ११ मजली इमारतीच्या सहाव्या मजल्यावर अग्निभडका उडाला. गुरुवारी सकाळी ७.३० वाजताच्या सुमारास जुहूतील जेव्हीपीडी येथील मनीषा इमारतीच्या सहाव्या मजल्यावर आग लागल्याची घटना घडली. काही वेळात आग वाऱ्यासारखी पसरली आणि वरील ७, ८ आणि ९ मजल्यावरील घरांना झळ बसली. इमारतीत धुराचे लोट पसरल्याने धुराचा त्रास होऊन ८ जण जखमी झाले





जुहू येथे जेव्हीपीडी रोड येथे मनीषा ही ११ मजली इमारत आहे. या इमारतीच्या सहाव्या मजल्यावरील थ्री बीएचके घरातील बेडरूममधून सकाळी साडेसात वाजता एसी युनिटमधून धूर निघाला आणि आग वाऱ्यासारखी पसरली

मुंबई अग्निशमन दलाला घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले. मात्र आग सहाव्या मजल्यावरून हळूहळू वरच्या मजल्यापर्यंत पसरत गेली. त्यामुळे संपूर्ण इमारतीत धूर पसरला. अनेक जणांनी खबरदारी म्हणून घरातच राहणे पसंत केले. मात्र त्यांना धुराचा त्रास होऊ लागला. तर काहींनी गच्चीवर धाव घेतली.

यावेळी अग्निशमन दलाने सहाव्या मजल्यावर धाव घेत आगीवर नियंत्रणासाठी प्रयत्न सुरूच ठेवले. यावेळी सहाव्या मजल्यावरील अन्य मजल्यांवरच्या घरांचे दरवाजेही आगीत सापडले. मात्र वेळीच पोहोचलेल्या अग्निशमन दलाने आगीवर नियंत्रणासाठी केलेल्या अथक प्रयत्नानंतर सकाळी साडेअकरा वाजता आगीवर नियंत्रण मिळवले.

### जखमींची प्रकृती स्थिर

या घटनेत गौतम झवेरी (८६), रिचा गुप्ता (४४), अल्पा (६३) अनुषा (३५), निपुल (५२), राहिल (३६), कोकिला झवेरी (९१), सरला धरू (८०) हे रहिवाशी जखमी झाले.

यामध्ये दोन जणांवर उपचार करून सोडण्यात आले, तर अन्य रहिवाशांची प्रकृती स्थिर असून त्यांच्यावर उपचार सुरू असल्याची माहिती मुंबई महापालिकेच्या आपत्कालीन नियंत्रण कक्षाकडून देण्यात आली.

# मणिपूरमध्ये सहा नागा नागरिकांची हत्या

● नवी दिल्ली, प्रतिनिधी :

मणिपूरमध्ये सहा नागा नागरिकांच्या झालेल्या हत्येचा नागालँडचे मुख्यमंत्री नेफियू रिओ यांनी तीव्र शब्दांत निषेध केला आहे. ही घटना 'भयानक आणि अमानुष' असल्याचे वर्णन करत त्यांनी दोषींवर त्वरित कारवाई करण्याची मागणी केली आहे, तसेच नागालँड, मणिपूर आणि नागा-बहुल भागातील लोकांना शांतता व संयम राखण्याचे आवाहन केले आहे.

रिओ यांनी म्हटले की, ही घटना जास्त वेदनादायी आहे कारण नागा संघटनांनी त्यांच्या ताब्यात असलेल्या १४ ओलीस व्यक्तींची सुरक्षित सुटका केली होती आणि त्यांच्या संपूर्ण कैदेत त्यांचे कल्याण, सुरक्षा व सन्मानाची खात्री केली होती; त्यानंतर ही हत्येची घटना घडली आहे.



मणिपूर पोलिसांनी बुधवारी सांगितले की, कांगपोकपी जिल्ह्यात सशस्त्र गटांनी ओलीस ठेवलेल्या आणि बेपत्ता असलेल्या सहा नागा पुरुषांचे मृतदेह त्यांना सापडले आहेत. रिओ यांनी भारत सरकार आणि मणिपूर सरकारला न्याय सुनिश्चित करण्यासाठी तातडीने पावले उचलण्याचे आवाहन केले असून, दोषींची ओळख पटवून त्यांना अटक करावी आणि कायद्यानुसार त्यांच्यावर खटला चालवावा अशी मागणी केली आहे.

# पुणे जिल्ह्यासह राज्यभरात रोटा लशीचा तुटवडा!

● पुणे, अभिजित येरल्लू :

पुणे जिल्ह्यातील लसीकरण कार्यक्रमाला गेल्या काही दिवसांपासून खीळ बसली असून, डायरियापासून संरक्षणासाठी बालकांना दिल्या जाणाऱ्या रोटा लशीचा तुटवडा निर्माण झाला आहे. अनेक तालुका स्तरावरील आरोग्य केंद्रांना ही लस उपलब्ध होत नसून, राज्यभरातच रोटा लशीचा पुरवठा विस्कळीत झाल्याचे स्थानिक प्रशासनाने मान्य केले आहे. येत्या २० जूनपर्यंत पुरवठा सुरळीत होण्याची शक्यता आरोग्य विभागाने व्यक्त केली आहे.

केंद्र सरकारच्या सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रमांतर्गत बालकांना जन्मापासून विविध टप्प्यांमध्ये एकूण २१ प्रकारच्या लशी दिल्या जातात. जिल्ह्यांच्या मागणीनुसार राज्य स्तरावरून लशींचा पुरवठा केला जातो. मात्र, रोटा लशीचे उत्पादन करणाऱ्या कंपन्यांकडून पुरवठ्यात अडथळे निर्माण झाल्याने राज्यभर तुटवडा जाणवत आहे. त्यामुळे अनेक जिल्ह्यांप्रमाणे पुणे जिल्ह्यातील लसीकरण मोहिमेवरही त्याचा परिणाम झाला आहे. आशा सेविकांनी नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले, की राष्ट्रीय लसीकरण मोहिमेनुसार बालकांना विविध वयोगटांमध्ये आवश्यक लशी देणे बंधनकारक आहे. पुणे जिल्ह्यातील तालुका आणि उपकेंद्र स्तरावर लशींच्या वितरणात तांत्रिक अडचणी येत असल्याचे समोर आले आहे. तालुक्यांच्या मुख्य आरोग्य केंद्रांमध्ये काही प्रमाणात साठा उपलब्ध असला, तरी अनेक उपकेंद्रांमध्ये लशींची कमतरता भासत आहे.रोटा लशीबरोबरच काही ठिकाणी धनुर्वात (टिटॅनस) लशीचाही मर्यादित साठा असल्याची माहिती समोर आली आहे. ही लस प्रामुख्याने गरोदर महिलांना प्राधान्याने दिली जात असल्याने इतर लाभार्थ्यांना ती उपलब्ध होण्यात अडचणी येत आहेत. आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, राज्य स्तरावर रोटा लशीचा पुरवठा पूर्ववत करण्यासाठी प्रयत्न सुरू असून, पुढील काही दिवसांत परिस्थिती सुधारण्याची अपेक्षा आहे. तोपर्यंत उपलब्ध साठ्याचे नियोजन करून लसीकरण सेवा सुरू ठेवण्यावर भर दिला जात आहे.



जिल्ह्यात कुठेही लशींचा तुटवडा नाही. सर्व सुरळीत आहे. आम्हाला जर कोणी मागणी केली, तर आम्ही ती त्वरित पूर्ण करतो. काही वेळा तांत्रिक अडचणींमुळे लस पोहोचण्यास उशीर होऊ शकतो. मात्र, आपल्याकडे मुबलक साठा असून अद्यायावत शीतगृहांची व्यवस्था आहे. २० जूनपर्यंत सर्व तालुक्यांतील आरोग्य केंद्रांना रोटा लशीचा पुरवठा होणार आहे. तालुका स्तरावरील सर्व आरोग्य केंद्रांनी निश्चित रहावे.

# नाशिक रिंग रोड: १४ गावांमध्ये अधिसूचना; प्रशासन 'ॲक्शन मोड'मध्ये!

● नाशिक, सचिन कदम :

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर, प्रस्तावित नाशिक परिक्रमा मार्ग अर्थात रिं ग रोडच्या भूसंपादनावर आक्षेप घेत आं दोलनाचे सत्र सुरू असताना जिल्हा प्रशासनाने या प्रकल्पातील २५ पैकी १४ गावांत कलम १९ अन्वये अधिसूचना प्रसिद्ध करीत संबंधित गावांमध्ये बाधित शेतकऱ्यांच्या बैठका घेण्याची तयारी केली आहे. या वेळी भूसंपादन प्रक्रियेविषयी माहिती देऊन हरकती व आक्षेप स्वीकारले जातील, तसेच थेट खरेदीचे महत्त्व समजावून दिले जाणार आहे.



शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडवण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या नाशिक परिक्रमा मार्गाचा विषय विविध कारणांनी वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. २५ गावांतून जाणाऱ्या ६६.१५ किलोमीटर लांबीच्या नाशिक रिंग रोड प्रकल्पासाठी ३६५ हेक्टर खासगी जमीन संपादित केली जाणार आहे. मोजणीला काही गावांत विरोध झाला. या प्रक्रियेत मातोरी, मुंगसरे येथे घरात शिरून प्रशासकीय अधिकाऱ्यासह पोलिसांनी मारहाण केल्याचे आरोप झाले. परिक्रमा मार्गाच्या सभोवताली आयएएस व आयपीएस अधिकारी, सत्ताधाऱ्यांच्या निकटवर्तीयांच्या जागा असून त्यांना भाव येण्यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या जात असल्याचा आरोप विरोधकांसह बाधित शेतकऱ्यांकडून होत आहे. नाशिक रिंग रोडचे संरेखन बदलण्याच्या मागणीसाठी बाधित शेतकरी आंदोलन करीत आहेत. या घटनाक्रमात जिल्हा प्रशासनाने १४ गावांत कलम १९ अन्वये अधिसूचना प्रसिद्ध करीत पुढील पाऊल टाकले.

### १४ गावांमध्ये बैठका

ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या ता रखेपासून ३० दिवसांच्या आत दावे व हरकती स्वीकारणे क्रमप्राप्त आहे. त्या अनुषंगाने भूसंपादन अधिकाऱ्यांनी संबंधित गावांमध्ये जाऊन बाधित शेतकऱ्यांची बैठक घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी दिले. बैठकीत हितसंबंधित शेतकऱ्यांना संपूर्ण भूसंपादन प्रक्रिया व थेट खरेदी प्रक्रिया याविषयी माहिती द्यावी आणि त्यांच्या शंकांचे निरसन करावे. ज्या शेतकऱ्यांना हरकत वा आक्षेप दाखल करायचे असतील, त्यांचे अर्ज स्वीकारले जातील.

# 'अग्निवीर'साठीही आता शिकवणी दुकाने

● छत्रपती संभाजीनगर, दिगंबर जाधव :

पोलीस भरतीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. रोजगाराच्या संधी थिजल्या आहेत. त्यामुळे बेरोजगार असण्यापेक्षा 'अग्निवीर' जवान होण्यात रस असणाऱ्या तरुणांसाठी आता गावोगावी दुकाने उघडली जात आहेत. छत्रपती संभाजीनगरमध्ये तर अशी एक गल्लीच आहे. या प्रत्येक डिफेन्स अकादमीमधून मुलांचा कलही वाढतो आहे. एका विद्यार्थ्यास साधारणत: दहा हजार रुपयांचे शुल्क या वर्गातून आकारले जाते.केंद्र सरकारने २१ वर्षांच्या आतील तरुणाईसाठी सैन्य दलात भरती होण्यासाठी आणलेल्या 'अग्निवीर'वर विरोधी पक्षांकडून सडकून टीका झालेली असली तरी दुष्काळी स्थिती आणि बेरोजगारीमुळे या योजनेकडे युवकांचा कल वाढत असल्याचेही चित्र दिसून येत आहे. त्यातही अग्निवीर होणारे बहुतांश तरुण हे शेतकऱ्यांची मुले आहेत. ज्याची आर्थिक स्थिती अगदीच तोळामासा आहे, पण 'बेरोजगारा'चा शिक्का बसण्यापेक्षा 'अग्निवीर' झालेले परवडणारे राहील, अशी प्रतिक्रिया निवडलेल्या विशीतील तरुणांची आहे. केंद्रीय लोकसेवा आयोग आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेच्या तयारीसाठी जशा 'ॲकॅडमी'चे व्यवसाय प्रत्येक जिल्ह्यात फुलले आहेत, तसाच व्यवसाय आता 'अग्निवीर'साठीही सुरू झाला आहे. शहरातील टीव्ही सेंटर भागात अशा अकादमीचे एक 'रिंगण'च तयार आहे.जुलै २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या अग्निवीरच्या परीक्षेचा निकाल मागील आठवड्यात लागला आहे.